किंमत - वार्षिक वर्गणी १००/- रुपये

# अर्थबोधपत्रिका

## मोजक्या वेळेत जगाबद्दलची जाण वाढविणारे उद्‌बोधक व माहितीपूर्ण मासिक


३● फेरफटका

५● गट नवा अभिजनांचा

९● चर्चा अभिजनांच्या कुठे व कशा ?

१३● शोध सरस्वतीचा....

१७● गज - 'राज' विरुद्ध प्रजा - 'राज'

२१● जिकडेतिकडे
(जीवनमृत्यूच्या सीमारेषेवर....)

२५● वर्षभरातील कामाचा लेखाजोखा

३१● अर्थबोधपत्रिका पुरवणी
(आव्हान महागाईचे आणि तुटीच्या व्यवस्थापनाचे)



खंड १० : अंक १ एप्रिल २०११

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी



**वार्षिक वर्गणी १००/- रुपये (परदेशस्थ वाचकांसाठी $ २०)**
वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/ पोस्टल ऑर्डर/चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

**'अर्थबोधपत्रिका'** दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.



वर्गणीसाठी पत्ता : व्यवस्थापक,
**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध, ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, (रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.
फोन : २५६५७१३२, २५६५७२१०, २५६५७६९७
ई-मेलः- ispe@vsnl.net
website - http://www.ispepune.org.in



**अर्थबोधपत्रिका**
**खंड १० (अंक १) एप्रिल २०११**
**संपादक - अभय टिळक**
**साहाय्यक संपादक - राज्यश्री क्षीरसागर**


*'अर्थबोधपत्रिकेतील माहिती कशी?*
- उद्‌बोधक, वाचनीय आणि रंजक
- अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- निःपक्ष व साधार
- सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक

### अर्थबोधपत्रिकेचा हेतू

**प्रतिष्ठित व अग्रगण्य नियतकालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यतः इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी वेचक माहिती संदर्भासह पुरविणे.**

*अर्थबोधपत्रिका कशी साकारते?*
- मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन
- निवडक साहित्याचे संकलन
- संकलित साहित्याला अन्य पूरक माहितीची जोड
- संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.


◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.

◆अंकातील लेख आपण नियतकालिकात/वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे.**यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

# फेरफटका

'अर्थबोधपत्रिके'चे स्वरूप नवागताला बुचकळ्यात पाडणारे असेच आहे. एक तर, अंकात कोठेही एकही जाहिरात नसते हे तर झालेच; पण, 'अर्थबोधपत्रिके'चीही जाहिरात कोठे बघायला सापडत नाही. हे नियतकालिक व्यापारी हेतूने चालविले जात नाही. स्टॉलवर ते कुठेही विक्रीसाठी ठेवलेले दिसत नाही. अंकांचे बाह्य रंगरूप चित्ताकर्षक अजिबातच नाही. विषयही तसे पठडीबाहेरचेच. त्यांतही पुन्हा, कोणत्याही लेखाखाली लेखनकर्त्याच्या नावाचा पत्ता नसतो. लेखातील मजकूर ज्या आधारभूत साहित्यावर बेतलेला असतो त्याचे रीतसर संदर्भ पुरविलेले असतात. मुख्य म्हणजे, लेखांचा आशय हा निखळ माहितीपर असतो. त्यांत लेखनकर्त्यांच्या मतांचे प्रतिबिंब चुकूनही सापडत नाही.... हे सारे नेमके काय 'मॉडेल' आहे, याचा उलगडा ब-याचदा होत नाही. अगदी प्रांजळपणे सांगावयाचे तर म्हणजे 'अर्थबोधपत्रिका' हा शुद्ध फेरफटका आहे... ज्ञान आणि माहितीच्या प्रांतातील फेरफटका ! ही मुशाफिरी करायची ती सोद्देश की निरुद्देश हे वाचकाने आपले आपले ठरवायचे. अगदी आजच्या युगातील, खास मार्केटिंगच्या प्रांतातील भाषा वापरावयाची तर, 'अर्थबोधपत्रिका' वाचणे हे एक प्रकारचे 'विन्डो शॉपिंग'च आहे. बाजारात काय काय नवीन चिजा आलेल्या आहेत, हे बघण्यासाठी आपण महिनाभरातून एखाद वेळी मॉलमध्ये चक्कर टाकतो. तसे बघितले तर आपल्याला काहीही खरेदी करायचे नसते. पण, खरेदी करण्याजोग्या काय काय वस्तू दुकानांत आलेल्या आहेत, याचा एक धावता आढावा घेणे हा जसा मनोरंजनाचा भाग असतो तसाच तो उद्याच्या मोठ्या खरेदीच्या पूर्वतयारीचाही एक अंश ठरतो. 'अर्थबोधपत्रिके'चे वाचन हा जणू याच प्रक्रियेचा वैचारिक प्रांतातील आविष्कार. जगात कोठे कोठे काय काय घडते-बिघडते आहे, याची तोंडओळख घडविण्याचा प्रयत्न इथे केलेला असतो. ज्या ज्ञानप्रांतांबद्दल अधिक काही तपशीलवार वाचायचे आहे त्या वाचनाचा 'प्लॅन' तयार करण्यास मदत करणारी सामग्री इथे सापडू शकते. याच हेतूने सुरू असलेला 'अर्थबोधपत्रिके'चा हा उपक्रम या अंकापासून १०व्या खंडात पदार्पण करतो आहे. ■■



# वाचकांचा प्रतिसाद

'अनोखा प्रयोग 'सायकल-ॲम्ब्युलन्स'चा (फेब्रुवारी २०११) हा लेख वाचला. ग्रामीण आरोग्यसेवेसाठी हा प्रयोग लाभदायक व कमी खर्चिक ठरू शकेल. अनेकांचे प्राणही यामुळे वाचतील. परंतु, या प्रयोगात आरोग्यसेवा किती लांब अंतरावर उपलब्ध आहे हा कळीचा प्रश्न आहे. लेखात असे म्हटले आहे की 'सायकल-ॲम्ब्युलन्स'चा सर्वांत लांबचा टप्पा २८ किलोमीटरचा होता. रुग्ण लवकरात लवकर रुग्णालयात पोहोचल्यास त्यास वेळीच उपचार मिळू शकतात. आता २८ किलोमीटरच्या टप्प्यांत चालकाला विश्रांतीची गरज आहे की नाही? नाहीतर दमछाक होऊन तो स्वतःच रुग्ण बनायचा! शिवाय ग्रामीण भागांतील रस्त्यांची परिस्थिती म्हणजे खड्ड्यांतील रस्ते अशी असते. यासाठी जवाहरलाल नेहरू सडक योजनेखालील ग्रामीण रस्त्यांचा विकास होणे आवश्यक आहे. नाही तर या रस्त्यांवरील प्रवासात रुग्ण दगावल्यास सध्याच्या मानसिकतेप्रमाणे त्याचे खापर त्या चालकावर फोडले जायचे! 'सायकल-ॲम्ब्युलन्स'चे नवीन प्रयोग चालू रहावेत. परंतु, या निमित्ताने एकूण ग्रामीण आरोग्याबाबतचा आढावा घेणे योग्य ठरेल.

*(पृष्ठ २३ वर पाहावे)*

## निवेदन

- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भासाठी विश्वसनीय, अधिकृत अशा साइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

# गट नवा अभिजनांचा

'न हि ज्ञानेन् सदृश्यं इह विद्यते' म्हणजे 'ज्ञानापेक्षा पवित्र जगात दुसरे काही नाही'. ज्ञानविज्ञानाच्या व माहिती-तंत्रज्ञानाच्या या युगात तर ही बाब अधिक ठळकपणे पुढे येते. आजच्या काळाचा विचार करता ज्ञानाचा (knowledge) आणि विशेष ज्ञानाचा म्हणजे विज्ञानाचा विस्तार अतिप्रचंड आहे तसाच तो मानवी जीवनावर सखोल आणि सर्वंकष परिणाम करणारा आहे. त्यामुळे, ज्ञानविज्ञानाच्या क्षेत्रातील अनेकानेक संशोधनांचा/व्यक्तींचा प्रभाव या काळावर पडणे हे स्वाभाविकच ठरते. याचबरोबर काही अभ्यासकांच्या निरीक्षणानुसार अंगभूत हुशारी वा अन्य काही कारणांमुळे नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर मोठा प्रभाव पाडण्याची क्षमता असलेले काही 'जागतिक नागरिक' हे जणू आज आधुनिक जगाचे नेतेच बनले आहेत. विविध प्रकारच्या जागतिक धोरणांवर त्यांचा प्रभाव कळत-नकळत पडतो आहे. (राजकीय) नेते नसतानाही नेतृत्व मिळविलेल्या या व्यक्तींजवळ वेगळ्या पण व्यवहार्य अशा कल्पना असतात. तर कधी अन्य मंडळींच्या अशा कल्पनांना पाठिंबा देऊन त्या व्यवहार्य बनविण्यासाठी आवश्यक असलेला 'सपोर्ट' उभा करण्याची त्यांची क्षमता असते.

साधारणपणे असे आढळते की, विविध काळांतील समाजजीवनावर अनेकदा अभिजन गटाचा प्रभाव राहिलेला आहे. त्या त्या काळातील राजेशाही, सरंजामशाही, घराणेशाही तर कधी लष्करी सामर्थ्य असे घटक अभिजनवर्गाच्या प्रभावाबाबत महत्त्वाचे ठरत गेले. पण आजच्या या काळात जगावर प्रभाव पाडणा-या अभिजनांमधील गुणवत्ता हे एक मोठे वैशिष्ट्य त्यांच्या प्रभावासंदर्भात महत्त्वाचे ठरते आहे. किंबहुना, गुणवत्तेवर आधारित असा हुशार व 'कॉस्मोपोलिटन' अभिजन गट आता आकाराला येतो आहे, असे दिसते. या अभिजन गटात हुशारीच्या बळावर ऐश्वर्यवान बनलेल्या अशा उद्योजकांचाही समावेश आहे. मायक्रोसॉफ्टचे बिल गेटस् किंवा फेसबुकचे संस्थापक मार्क झुकेरबर्ग.ही याची काही उदाहरणे.



या नव्या अभिजन गटाचे आणखी एक वैशिष्ट्य असे की तो 'कॉस्मोपोलिटन' असला तरी त्याची 'मायदेशी मुळे' घट्ट आहेत. त्यामुळे या गटातील चिनी अन्य चिनी नागरिकांबरोबर संपर्क ठेवून असतो, त्याप्रमाणेच भारतीय नागरिकदेखील अन्य भारतीय नागरिकांच्या संपर्कात असतो. त्यामुळे 'सोशल नेटवर्किंग'च्या माध्यमातूनही जागतिक पातळीवर त्यांचा प्रभाव पडत असतो. आणखी बाब अशी दिसून येते आहे की, गुणवत्ता हा निकष महत्त्वाचा मानला जाऊन समान गुणवत्ता संच असलेला जोडीदार निवडण्यास अभिजन गट प्राधान्य देत आहे. परिणामी, या गटातील नव्या पिढीला सभोवतालच्या वातावरणाचा आणि कुटुंबांतून मिळालेल्या गुणवत्तेचा फायदा होऊन ती अधिक हुशार बनू लागली आहे. त्यामुळे जेथे गुणवत्ता आहे ती पिढी आणि गुणवत्तेचा वारसा न मिळालेली इतरेजनांची पिढी यांच्यात मोठी तफावत आढळत आहे. त्यामुळे विकसित देशांमध्ये एकप्रकारे अशा प्रकारची असमानता वाढते आहे, असे अभ्यासकांचे निरीक्षण आहे.

हा हुशार व श्रीमंत असलेला अभिजन गट अन्य नागरिकांच्या जीवनावर परिणाम घडवून आणत असतो. या गटाकडून होणारा पैशाचा विनियोग व त्यामुळे घडून येणारे बदल हा पहिला परिणाम होय. त्यांच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी बाजारपेठा सज्ज होतात. उदाहरणार्थ, विविध प्रकारच्या व उत्तम अशा ग्राहकोपयोगी वस्तू असणारी दुकाने, शॉपिंग मॉल्स इत्यादी. तसेच त्यांना विविध प्रकारच्या सेवा देणारे क्षेत्र विकसित होऊ लागते. उदाहरणार्थ, हॉटेल्स, पर्यटनविषयक सेवा इत्यादी. शिवाय, हा अभिजन गट विविध संशोधनकार्याला, शैक्षणिक संस्थांना आणि अनेक विषयांत काम करणा-या नागरिकांच्या दबावगटांना आर्थिक साहाय्य करत असतो. त्याचाही समाजावर परिणाम होत असतो. मुळात अशाप्रकारे श्रीमंत होण्यासाठी त्यांना आयुष्यात काहीतरी अ-साधारण असे काम करावे लागलेले असते, हा दुसरा परिणामही महत्त्वाचा आहे. अर्थात, त्यातील काही मोजक्यांना लक्ष्मीकृपेचा वरदहस्त जन्मापासून लाभलेला असला तरी अनेक जण निखळ आपल्या कर्तृत्वाने श्रीमंत झाले आहेत. त्यामुळे ते 'डायनॅमिक' व बदल घडवून आणण्यास उत्सुक असतात. त्यांच्या या गुणवैशिष्ट्यांमुळेही समाजावर परिणाम घडून येऊ शकतात.

## अभिजन कोण?

या अभिजन गटात कोणकोणत्या नागरिकांचा समावेश करता येईल, याचा अभ्यास Capgemini या कंपनीतर्फे करण्यात आला आहे. राहते घर सोडून ज्यांची गुंतवणुकीस योग्य अशी मालमत्ता दहा लाख अमेरिकी डॉलर वा त्यापेक्षा अधिक आहे, त्यांचा समावेश या अभिजन गटात करण्यात आला आहे. या निकषानुसार जगभरात किमान एक कोटी नागरिक अभिजन गटात आहेत, असे या पाहणीचा निष्कर्ष सांगतो. अभिजन गटाबाबत Credit Suisse या बँकेने वेगळा निकष वापरला आहे. त्यानुसार, ज्या व्यक्तीची एकूण मालमत्ता किमान एक कोटी इतकी आहे त्या व्यक्तीचा समावेश अभिजन गटात करण्यात आला आहे. या मालमत्तेत घरापासून ते घरातील विविध कलाकृतींचा (भव्य चित्रे, शोभेच्या वस्तू इत्यादी) समावेश करण्यात आला आहे. Credit Suisseच्या 'ग्लोबल वेल्थ रिपोर्ट'नुसार २०१०च्या मध्यावधीपर्यंत जगभरातील एकूण २ कोटी ४२ लाख नागरिक अभिजन गटात मोडतात.

म्हणजेच, जगातील प्रौढ नागरिकांच्या संख्येच्या ०.५ टक्के इतके नागरिक अभिजन गटात आहेत असेही म्हणता येईल. जगातील एक-तृतीयांश मालमत्ता (म्हणजे सुमारे ६९. २ ट्रिलियन अमेरिकी डॉलर) या अभिजन गटाजवळ आहे. या गटातील सुमारे ४ टक्के नागरिक अमेरिकेत, १० टक्के नागरिक जपानमध्ये आणि ३ टक्के नागरिक चीनमध्ये वास्तव्य करून आहेत. यांतील १६ टक्के नागरिकांना श्रीमंती वारसाहक्काने मिळाली होती तर ऊर्वरित सर्व स्वकष्टाने, हुशारीने श्रीमंत झाले, असे हा अभ्यास सांगतो.

श्रीमंत बनण्यासाठी 'जिनिअस' असायलाच हवे असे नाही, पण हुशारी असेल आणि मेहनत करायची तयारी असेल तर ते नक्कीच उपयुक्त ठरते. अमेरिकेतील अभिजन गटात मोडणाऱ्या अनेक व्यक्ती साधारणतः सामान्य गटातून पुढे आलेल्या आहेत, असे निरीक्षण Thomas Stanley आणि William Danko यांनी The Millionaire Next Door या पुस्तकात नोंदले आहे. अशा व्यक्तींची राहणी साधी असते आणि पैसा गुंतवण्याकडे त्यांचा कल असतो.



अभिजन गटातील २३ टक्के नागरिक हे उत्तम पगार मिळाल्याने या गटात पोहचले आहेत, असे Capgemini च्या अभ्यासाने म्हटले आहे. विविध कंपन्यांमधील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांचा आणि आपल्या अभ्यासाच्या व कुशलतेच्या जोरावर पुढे आलेल्या विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांचा यात समावेश आहे. २००८साली निर्माण झालेल्या आर्थिक संकटामुळे अभिजन गटाची संख्या १५ टक्क्यांनी घटली खरी, पण, परिस्थितीत सुधारणा झाल्यानंतर २००९मध्ये त्यात ३० टक्के वाढही झाली, असे चित्र या अभ्यासातून स्पष्ट झाले आहे. याच काळात आशिया आणि युरोपमधील अभिजनांची संख्या समानतेच्या पातळीकडे झुकू लागली. या दोन्ही खंडांतील प्रत्येकी सुमारे ३० लाख नागरिकांचा समावेश अभिजन गटात झाला होता. या वेळी आशियातील अभिजन गटातील नागरिकांची एकत्रित मालमत्ता युरोपमधील नागरिकांच्या एकत्रित मालमत्तेपेक्षा अधिक होती. युरोप व आशियाच्या तुलनेत अमेरिकेतील अभिजन गट आघाडीवर होता.

## पिरॅमिड संपत्तीचा

जागतिक पातळीवरील संपत्तीच्या पिरॅमिडचा पाया रुंद आहे आणि शिखर एकदम निमुळते आहे. सर्वांत श्रीमंत गटात मोडणाऱ्यांची संख्या अत्यल्प म्हणजे फक्त एक टक्का इतकी असून जगभरातील एकूण ४३ टक्के मालमत्ता या व्यक्तींकडे आहे. तर, सांपत्तिक स्थिती उत्तम असलेल्या १० टक्क्यांकडे ८३ टक्के मालमत्ता आणि ऊर्वरित सुमारे ५० टक्के नागरिकांकडे फक्त दोन टक्के इतकीच मालमत्ता असल्यावे आढळते. पिरॅमिडच्या अगदी तळाशी असलेल्या सुमारे ५० टक्के नागरिकांकडे असलेली मालमत्ता नगण्य असते. संपत्तीच्या पिरॅमिडचा (स्वाभाविक?) परिणाम असा होतो की, ज्यांच्या हाती पैसा आहे त्यांचे समाजातील वजन वाढते. मग, विविध धोरणांच्या संदर्भात श्रीमंत व सांपत्तिक स्थिती उत्तम असलेल्या व्यक्तींचा विचार/मत लक्षात घेतले जाते, उदाहरणार्थ, कोणत्या उद्योगांना निधी उपलब्ध करून द्यायचा, कोणत्या सामाजिक कार्याला मदत करायची इत्यादी अनेक. अभिजन गटात समावेश झालेल्या जगभरातील व्यक्तींच्या विविध विषयांवरील चर्चा कुठे व कशा झडतात हे समजून घेणेही उद्बोधक आहे. ■■

सामाजिक

# चर्चा अभिजनांच्या कुठे व कशा ?

नेदरलँडस् येथील Arnhem गावानजीक असलेले Hotel de Bilderberg येथे दरवर्षी जागतिक पातळीवर ख्याती मिळविलेल्या अशा काही खास व्यक्तींसाठी - अभिजनांसाठी - एका परिषदेचे आयोजन करण्यात येते. (कधी परिषदेचे स्थान बदलले तरी) ही परिषद Bilderberg conference किंवा Bilderberg group या नावाने ओळखली जाते. राजकारण, उद्योग-व्यापार, बँकिंग, माध्यमे आणि संरक्षण/लष्कर या क्षेत्रांतील जागतिक पातळीवरील निवडक तज्ज्ञांना या परिषदेचे खास निमंत्रण पाठविले जाते. निमंत्रितांशिवाय अन्य कोणालाच तेथे प्रवेश नसतो. माध्यमातील एक किंवा दोन व्यक्तीच तेथे उपस्थित असतात आणि ते देखील तेथील घडामोडींबाबत काहीही लिहायचे नाही, त्याबाबत कुठे काही बोलायचे नाही या अटींवरच. बंद दाराआड होणा-या या परिषदेनंतर माध्यमांसाठी कोणत्याही प्रकारचे पत्रक काढले जात नाही. ही परिषद गोपनीय असल्याने आणि आपले कोणते वाक्य दुस-या दिवशी माध्यमांसाठी मथळ्याची बातमी ठरेल, याची चिंता नसल्याने अभिजनांना अनेक विषयांवर मोकळी चर्चा करता येते.

पहिली Bilderberg conference १९५४मध्ये आयोजित करण्यात आली होती. युरोपीय देशांमधील अमेरिकाविरोध हा त्या परिषदेत चर्चेचा केंद्रबिंदू ठरला होता. त्या नंतर अशा अनेक परिषदा झाल्या. गेल्या वर्षी २०१०मध्ये स्पेनमध्ये झालेल्या परिषदेत मायक्रोसॉफ्टचे अध्यक्ष बिल गेट्स्, हार्वर्ड विद्यापीठाचे माजी अध्यक्ष लॅरी समर्स, डॉइश बँकेचे अध्यक्ष, युरोपियन कमिशनचे माजी उपाध्यक्ष इत्यादी मान्यवर सहभागी झाले होते. संपूर्ण युरोपसाठी 'युरो' हे एकमेव चलन वापरात आणता येईल का, याची चर्चा सर्वप्रथम पूर्वी झालेल्या अशा परिषदेत झाली होती. इराक युद्धाबाबत असलेले तीव्र मतभेद अशाच एका परिषदेतून पुढे आले होते. युरोपमधील आर्थिक प्रश्न व युरोचे भवितव्य हे विषयही चर्चेत होते.



अभिजन गटाचा सहभाग असलेली आणखी एक परिषद आयोजित करण्यात येते ती डावोस इथे. 'वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम' या नावाने ही परिषद ओळखली जाते. आंतरराष्ट्रीय बाजारपेठ विविध वस्तूंनी, उत्पादनांनी गजबजते आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांचा पसारा वाढतो आहे. तसेच माहितीचा विस्फोट होण्याचा व जागतिकीकरणाचा हा काळ आहे. अशा वेळी जगात कोणकोणत्या विषयांत कुठे काय घडते आहे, कोणकोणते मुद्दे चर्चेत आहेत याची माहिती करून घेण्यासाठी 'कॉस्मोपोलिटन' अभिजन गट डावोस इथे एकत्र येतो. राजकीय नेते, मोठमोठ्या कंपन्याचे प्रमुख कार्यकारी अधिकारी, आंतरराष्ट्रीय पातळीवर नावाजले गेलेले वित्तक्षेत्रातील तज्ज्ञ, विचारवंत इत्यादी मंडळींना या परिषदेचे निमंत्रण असते. आंतरराष्ट्रीय राजकारणावर परिणाम घडवून आणणारे काही महत्त्वाचे निर्णयही अशा वेळी घेतले जातात. उदाहरणार्थ, टर्की व ग्रीस यांच्यातील तसेच इस्त्रायल आणि पॅलेस्तिन यांच्यातील काही राजकीय निर्णय तिथे घेतले गेले होते.

अशाच प्रकारच्या परिषदा Trilateral Commission आणि Boao meetings या आहेत. अशा वेळी एकत्र येणा-या अभिजनांचे काही क्लबही असतात. जगभरातील भारतीय अभिजनांचा - प्रामुख्याने उद्योगांशी संबंधित व्यक्तींचा - The Indus Enterprise असा एक क्लब आहे. उद्योजकता वाढावी व त्याद्वारे संपत्तीचा ओघ नार्मिाण व्हावा आणि त्या संपत्तीचा उपयोग समाजासाठी व्हावा, यासाठी The Indus Enterpriseचे कार्य चालू आहे. न्यूयॉर्क आणि वॉशिंग्टन येथील काही व्यक्ती The Council of Foreign Relationsमध्ये सहभागी होतात. अमेरिकेतील The Carnegie Endowment for International Peace ही संस्थादेखील या संदर्भात उल्लेखनीय कार्य करते. आंतरराष्ट्रीय धोरणांवर प्रभाव पडावा यासाठी वेगवेगळ्या विषयांतील तज्ज्ञांनी आपल्या संस्थेच्या संपर्कात यावे यासाठी ही संस्था प्रयत्नशील असते. सरकारच्या नियंत्रणात राहावे लागणा-या चीन आणि रशिया येथील विचारवंतांनादेखील Carnegieने आकर्षित केले आहे. अमेरिका आणि रशिया या देशांमधील विविध विषयांच्या संदर्भातील संवाद सतत चालू असावा यासाठी Carnegieच्या मॉस्को येथील कार्यालयाने महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

**आता अभिजनांमध्ये विद्यापीठेही**

अलीकडच्या काळात अभिजन गटाची व्याप्ती वाढू लागली असून जागतिक पातळीवरील मान्यताप्राप्त अशी विद्यापीठेही 'कॉस्मोपोलिटन' बनू लागली आहेत, असे मत मांडण्यात येत आहे. जागतिक पातळीवर उच्चशिक्षण घेण्याची इच्छा, आकांक्षा अनेक तरुण मनी बाळगून असतात. त्यातील बहुतेकांचा ओढा अमेरिकेकडे अधिक आहे. ब्रिटन, फ्रान्स आणि जर्मनी या देशांकडेही काही विद्यार्थी वळत आहेत. अमेरिकेतील विविध विद्यापीठांमधून संगणक व अर्थशास्त्र या विषयांचे शिक्षण घेणारे सुमारे ६५ टक्के विद्यार्थी परदेशी आहेत तर पदार्थविज्ञान आणि गणित या विषयांसाठी हे प्रमाण अनुक्रमे ५६ टक्के व ५५ टक्के इतके आहे.

औद्योगिक कंपन्यांच्या सहकार्याने या विद्यापीठांमधून विविध प्रकारचे संशोधनकार्य हाती घेतले जाते. उद्योजकता वाढण्यासाठी ही जणू पहिली पायरी ठरते. Kauffiman Foundation या संस्थेने २००९मध्ये केलेल्या एका अभ्यासातून असे आढळले की, 'मॅसॅच्युसेट्स् इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी' येथून शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांनी सुमारे २५ हजार ८०० कंपन्या स्थापन केल्या असून त्यामुळे लाखो नागरिकांना नोक-या मिळाल्या आहेत. या कंपन्यांची एकूण उलाढाल सुमारे दोन ट्रिलियन अमेरिकी डॉलर इतकी आहे. त्यामुळे विद्यापीठांच्या माध्यमातून युवा गटही अभिजन बनण्याच्या पाय-या चढत असतो, असे दिसते.

**नवकल्पनांच्या शोधात**

अभिजन गटातील विचारवंतांना, हुशार व कल्पक मंडळींना एकत्र आणण्याचे काम Nathan Myhrvoid यांची Intellectual Ventures ही कंपनी करते. मायक्रोसॉफ्ट कंपनीत तंत्रज्ञान विभागाच्या प्रमुख पदावर Nathan Myhrvoid यांनी काम केले आहे. त्यांच्या कंपनीकडून invention sessions आयोजित केली जातात. नवनवीन कल्पना मांडण्यासाठी, नवे काही सुचविण्यासाठी हे हक्काचे व्यासपीठ असते. ॲपल, गुगल, सोनी, नोकिया इत्यादी अनेक कंपन्यांमधील हुशार अभिजन यात सहभागी होतात. हे सर्व संभाषण ध्वनिमुद्रित केले जाते. आवश्यकतेनुसार संशोधनपर लेखांची जोड या संभाषणाला दिली जाते.



मलेरियाचा प्रादुर्भाव करणा-या डासांना लेसर किरणांच्या साहाय्याने नष्ट करणे शक्य आहे का, असा प्रश्न एकदा एका व्यक्तीने उपस्थित केला होता. सुरुवातीला हसण्यावारी नेल्या गेलेल्या या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न झाला आणि त्याबाबत प्रत्यक्ष कृतीही झाली. आता असे उत्पादन तयार करण्यासाठी कोणती कंपनी पुढाकार घेऊ इच्छिते याची चाचपणी सुरू आहे. अणुऊर्जा निर्माण करताना आण्विक कच-याचा प्रश्न गंभीर ठरतो. आण्विक कच-याचा उपयोग इंधन म्हणून करणारी अणुभट्टी अशाच एका गटाने तयार केली आहे. बिल गेट्स् यांनी या कामी पुढाकार घेतला आहे. विज्ञान व तंत्रज्ञान जसजसे प्रगत होत आहे तसतसे विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांमधील परस्परसहकार्य वाढण्याची गरज आहे, असे मत Nathan Myhrvoid मांडतात. अशा वेळी पेटंटसंदर्भात कोणत्याही अडचणी निर्माण होऊ नयेत याची काळजीही घेतली जाते, असे ते स्पष्ट करतात.

हुशार व कल्पक लोकांना एकत्र आणण्याचे काम भारतातही झाले ते सर्व भारतीयांना 'बायोमेट्रिक ओळखपत्राच्या आधारे एक विशिष्ट क्रमांक' देण्याच्या अनोख्या योजनेची सुरुवात करताना. इन्फोसिसचे नंदन निलेकणी यांच्या नेतृत्वाखाली ही योजना राबविण्यात येत आहे. यासाठी निलेकणी यांनी अमेरिकेत विविध कंपन्यांमध्ये काम करणा-या अभिजन गटातील भारतीयांना बेंगळूरू येथे आमंत्रित केले होते. प्राथमिक चर्चेनंतर आता प्रत्यक्ष कृती चालू झाली असून ऑक्टोबर २०१०मध्ये एका व्यक्तीला असा पहिला क्रमांक देण्यात आला. नियोजनानुसार सर्व काही पार पडले तर भारतातील लाखो नागरिकांना असा क्रमांक मिळू शकेल व त्याचा उपयोग त्यांना दैनंदिन व्यवहारांत अनेक ठिकाणी (उदाहरणार्थ - परगावी पैसे पाठविणे इत्यादी) करता येणे शक्य होणार आहे. अलीकडच्या काळात अनिवासी भारतीयांची संख्या जगभरात सुमारे अडीच कोटी असून त्यांच्या मदतीने भारताला विविध क्षेत्रांत प्रगतीच्या दिशेने वाटचाल करणे सुलभ ठरू शकते.

अभिजन गटाच्या चर्चा या जगात कुठेही झाल्या तरी आंतरराष्ट्रीय राजकारणासाठी तसेच सर्वसामान्यांसाठी त्या अनेकदा उपयुक्त ठरू शकतात, हे इथे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. ■■

संशोधन

# शोध सरस्वतीचा....

प्राचीन संस्कृतीचा शोध माणसाला नेहमीच कुतूहलाचा ठरला आहे. हजारो वर्षापूर्वीचा माणूस कसा होता, त्याची राहणी कशी होती, त्याच्या सभोवतालचे पर्यावरण कसे होते, काळाच्या ओघात हे सर्व नष्ट कसे झाले अशा अनेक प्रश्नांची उकल करण्याचा हा प्रयत्न असतो. काही प्रश्नांची उत्तरे सापडतात तर काहींची नाही. ज्या प्रश्नांची उत्तरे सापडतात त्यातही अनेकदा मतमतांतरे असतात. असे असले तरी जुन्याचा शोध चालूच असतो. गेल्या दोन शतकांपासून सरस्वती नदीच्या शोधाबाबत असेच काहीसे घडते आहे.

प्राचीन काळी हिमालयानजीकच्या सप्तसिंधूंच्या प्रदेशात आर्यांनी वसाहत केली होती. सरस्वती ही त्या काळातील एक श्रेष्ठ नदी. ऋग्वेदात तिचा उल्लेख आहे. सरस्वती नदी हिमालयात प्लक्षप्रस्रवण या स्थानी उगम पावली. कुरुक्षेत्रातून वाहत जाऊन पुढे ती राजस्थानच्या वाळवंटात लुप्त झाली, मग तीच नदी पुन्हा अबू पर्वतातून प्रकट होऊन कच्छच्या रणात परत एकदा लुप्त झाली, पुन्हा एकदा सौराष्ट्रात प्रकट होऊन शेवटी प्रभासतीर्थाजवळ ती समुद्राला मिळाली, असे वर्णन पुराणात केले आहे. वेदोत्तर काळात सरस्वती नदी कुरुक्षेत्रात एका जागी लुप्त झाली, असे ब्राह्मण ग्रंथात म्हटले आहे. सध्या पंजाबातून वाहणारी सरसुती नदी हीच प्राचीन सरस्वती होय, असे मानले जाते. ही नदी शिवालिक पर्वतराजीतील सिरमूर पर्वतात उगम पावून, अंबाला जिल्ह्यात आद-बद्री या ठिकाणी पठारावरून वाहू लागते. ती छलौर नामक गावाजवळ वाळूत लुप्त होऊन भवानीपुराजवळ प्रकट होते. बलछप्पर येथे ती पुन्हा लुप्त होऊन बरखेडाजवळ पुन्हा प्रकट होते. उणईजवळ मार्कंडा नदी हिला मिळते आणि मग ती घग्गर नदीला मिळते. घग्गर नदीला प्राचीन काळी सरयू असे नाव होते, अशी ही सरस्वती त्यानंतर राजस्थानातील हनुमानगडाजवळील भटनेर गावाजवळ वाळवंटात लुप्त होते.



काळाच्या ओघात लुप्त झालेल्या सरस्वतीचा शोध घेण्याचे आव्हान अभ्यासकांना कायम खुणावत आले आहे. अलीकडेच संशोधक-अभ्यासक Michel Danino यांनी पुराणकथा, मिथके, लोककथा, पुरातत्वविषयक साहित्य, सरस्वती नदीच्या परिसरातील वातावरण, गॅझेटिअर, भूगर्भशास्त्र इत्यादी अनेक बाबींचा अभ्यास करून प्राचीन काळी सरस्वती नदी अस्तित्वात होती, ती केवळ पौराणिक मिथक नाही, या निष्कर्षावर शिक्कामोर्तब केले आहे. हिमालयात उगम पावलेल्या सरस्वतीचा प्रवाह अरवली पर्वतरांगांच्या पश्चिमेकडील बाजूने सतलजपर्यंत असावा आणि सनपूर्व ३००० ते १९०० या काळात कच्छच्या रणात सरस्वती लुप्त झाली असावी, असे त्यांनी म्हटले आहे. हिमालयातील बर्फ वितळून झालेला पाण्याचा प्रवाह यमुना आणि सतलज या उपनद्यांमार्फत उगमानंतर अगदी सुरुवातीच्या काळात सरस्वतीला मिळत होता. या उपनद्यांकडून मिळणा-या पाण्याचा प्रवाह घटल्यानंतर सरस्वती ही गंगेची उपनदी बनली. या नंतर भूस्तरातील हालचालींमुळे सरस्वतीचा प्रवाह आटला असावा, असे त्यांनी म्हटले आहे.

सरस्वती नदी कोणती यासंबंधी अन्य संशोधकांनी बरीच मते मांडली आहेत. काही संशोधकांच्या मते ऋग्वेदातील सरस्वती ही सिंधूच होय; पण हे मत सर्वमान्य झालेले नाही. सरस्वती ही सिंधू नदीची एक उपनदी होती, असे काहींचे मत आहे. पण तेही सिद्ध झालेले नाही. पंजाबमधील सरसुती हीच सरस्वती होय, असे मानले जाते. राजस्थानात हक्रा नामक नदीच्या कोरड्या पात्राचे संशोधन केले असता तिथे अनेक प्रागैतिहासिक स्थानांचा शोध लागला. ती हक्रा म्हणजेच वाळवंटात गुप्त झालेली सरस्वती होय, असे संशोधकांचे मत आहे. पूर्व पंजाबमधील घग्गर म्हणजे सरस्वती नदी राजस्थानात गेल्यावर कोरडी झाली आणि तिलाच पुढे हक्रा असे नाव मिळाले. घग्गर नदी हीच सरस्वती नदी होय, असे प्रतिपादन Danino यांनीदेखील केले आहे. भूस्तरातील हालचालींचा परिणाम होऊन तसेच पाण्याचा प्रवाह आटल्याने सरस्वतीचा प्रवाह खंडित झाला, ती शुष्क बनली, असे स्पष्टीकरण ते देतात. पण असे परिणाम फक्त सरस्वती नदीच्या बाबतीतच झालेले का आढळतात, याबाबत मात्र नेमका उलगडा होत नाही.

या सिंधू नदीच्या परिसरात सनपूर्व ५०००च्या सुमारास मानवी संस्कृतीचा विकास झाला. मोहेंजोदारो आणि हडप्पा येथील उत्खननातून या प्राचीन संस्कृतींच्या अस्तित्वाचे पुरावे याच परिसरात सापडले आहेत. या संस्कृतीबाबतचे सविस्तर विवेचन Danino यांनी केले आहे. या प्राचीन संस्कृतीच्या अधिक खाणाखुणा सरस्वती नदीच्या (घग्गर-चौतांग-हक्रा) परिसरात सापडल्या आहेत, असे Danino म्हणतात. त्यामुळे त्या प्राचीन संस्कृतीला 'सिंधू-सरस्वती संस्कृती' (Indus-Saraswati) असे त्यांनी संबोधले आहे. या संस्कृतीशी संबंधित असलेल्या शहर नियोजन, कला, कृषी, वास्तूरचना इत्यादी अनेक बाबी संशोधनांतून पुढे आल्या आहेत. गंगा नदीच्या परिसरात त्या नंतर विकसित झालेली संस्कृती ही 'सिंधू-सरस्वती संस्कृती'चेच नवे रूप असल्याचे Danino यांना वाटते. हडप्पा संस्कृतीचा विस्तार मोठ्या प्रमाणात झाला होता आणि पश्चिमेकडील देशांबरोबर तिचे व्यापारी संबंधही प्रस्थापित झाले होते, असे त्यांना अभ्यासातून आढळले आहे. या संस्कृतीचा विकास ग्रामीण-शहरी-ग्रामीण अशा तीन टप्प्यांतून झाला होता, असे मत त्यांनी मांडले आहे.

एकेकाळी प्रगत झालेल्या या संस्कृतीचा -हास कसा झाला असावा याचेही विवेचन ते करतात. सरस्वती नदीच्या लुप्त होण्यामागे वातावरणातील बदल हे एक मोठे कारण ठरले असावे, असे अनुमान ते मांडतात. या संदर्भात पाणी व जमिनीच्या (अतिरिक्त?) वापरामुळे त्या काळी उद्भवलेले सामाजिक-आर्थिक प्रश्न याही बाबींचा विचार Danino यांनी केला आहे. भारतातील आजच्या विकासप्रक्रियेच्या संदर्भात हे मुद्दे विशेष लक्षात घेण्यासारखे आहेत. भूस्तरातील हालचालींमुळे सतलज नदीला वारंवार पूर आले असावेत, असे त्यांना वाटते. दुष्काळ आणि पूर या दोन्ही घटनांना सामोरे जावे लागल्याने सिंधू संस्कृतीचा -हास झाला असावा, असे त्यांचे संशोधन सांगते. पाण्याची उपलब्धता हा मानवी संस्कृतीच्या विकासातील महत्त्वाचा घटक होय. त्यामुळे नद्यांचा इतिहास या संदर्भात अभ्यसनीय व उल्लेखनीय ठरतो. सरस्वती नदीच्या परिसरात विकसित झालेल्या संस्कृतीचा अभ्यास भूगर्भशास्त्र, पर्यावरणीय विज्ञान, कृषिशास्त्र, शहरीकरण, जमीन व पाण्याचा वापर, परिसंस्थांची हानी अशा अनेक अंगांनी करायला हवा.



म्हणजे, गंगा नदीच्या परिसरातील संस्कृतीबाबत आणखी काही नव्या वास्तूरचना, शहर नियोजन, तत्कालीन तंत्रज्ञान व कला, ब्राह्मी लिपी आणि उभय संस्कृतींची धार्मिक चिन्हे व अन्य बाबींवरून केलेल्या संशोधनांच्या आधारे Danino यांनी तीन निष्कर्ष काढले आहेत.

हडप्पा संस्कृतीच्या आरंभानंतर 'भारतीयता' आकाराला आली, हा त्यांचा पहिला निष्कर्ष होय. हडप्पा संस्कृतीचे नागरिक हे वैदिक काळातील होते हा त्यांचा दुसरा निष्कर्ष आहे. आणि तिसरा निष्कर्ष असा आहे की, सध्या गंगा नदीच्या परिसरातील संस्कृती ही हडप्पा संस्कृतीचेच नवे रूप आहे. सरस्वती नदीविषयक संशोधनाच्या वर्तुळात हे तीनही निष्कर्ष चर्चेचे व महत्त्वाचे ठरावेत.

अवकाशातील एक ग्रह असलेल्या या वसुंधरेचे व तिच्या अंगाखांद्यांवर खेळलेल्या संस्कृतींचे अभ्यास-संशोधन हे अतिशय गुंतागुंतीचे विषय आहेत, हेच खरे ! ■■


## दुसरी आवृत्ती प्रकाशित

***आपल्या दैनंदिन जीवनावर प्रभाव पाडणा-या क्रांतिकारी मेंदूसंशोधनावरील आकर्षक, सचित्र व संग्राह्य ग्रंथ***

# कर्ता-करविता

## आधुनिक मेंदूसंशोधन व आपले जीवन

**मराठी भाषेला अभिमान वाटावा असे पुस्तक - डॉ. ह. वि. सरदेसाई**

●मेंदूसंशोधन ही एक क्रांतीच! मानवी जीवनाला अधिक उच्च टप्प्यावर नेणारी ऐतिहासिक घटना! या क्रांतीचा आलेख रेखाटणारा ग्रंथ.

**पृष्ठे २४२** **किंमत ३५०/-रुपये**

**प्राणीजीवन**

# गज - 'राज' विरुद्ध प्रजा - 'राज'

जिल्हा जलपैगुडी... राज्य पश्चिम बंगाल... वर्ष २००७... महिना सप्टेंबरचा... तारीख २३ आणि वेळ रात्रीची... पण, रात्र गडद अंधारी नाही तर शीतल चंद्रप्रकाशाने दुधाळलेली. मालवाहतूक करणा-या आगगाडीच्या रूपाने एक-दोन नाही तर तब्बल सात हत्तींचा मृत्यू ओढवला. हत्तींच्या संचारक्षेत्रातून जाणा-या या लोहमार्गावर आगगाड्यांचा वेग ताशी २० किलोमीटरपेक्षा अधिक असता कामा नये, असा वास्तविक नियम. मात्र, या दुर्घटनेला साक्षी असणा-या वनखात्यातील एका कर्मचा-याच्या मते ही मालगाडी ताशी जवळपास चांगली ९० किलोमीटर वेगाने धावत होती. गाडीचालकाच्या बयानानुसार, अंधा-या रात्री लोहमार्गावर एकदमच अवतरलेले गजराज त्याला दिसलेच नाहीत.... कारण काहीही असो, एका वेळी सात हत्ती काळाच्या मुखात ढकलले गेले. तीन हत्तीणी, एक पूर्ण वाढ झालेला सुळेधारी प्रौढ नर, दोन तरुण हत्ती आणि बागडण्याच्या वयातील एक पिलू यांचा त्या सातांत समावेश होता.

खरी कथा पुढेच आहे ! या अपघाताच्या वृत्ताने खूपच खळबळ माजली. रेल्वेमार्गावर पडलेली हत्तींची मृत धुडे पाहून सहानुभूती आणि करूणेच्या लहरी सर्वसामान्यांमध्ये निर्माण झाल्या. चर्चा-मुलाखतींचे जणू पेवच दृक-श्राव्य माध्यमांवर फुटले. यांत एक मुलाखत म्हणा वा प्रतिक्रिया म्हणा होती ती रेल्वे बोर्डातील एका वरिष्ठ अधिका-याची. या अपघाताबद्दल टिप्पणी करताना हे महाशय म्हणाले "... काय करणार ! त्यांना नेमून दिलेल्या अधिकृत, संरक्षित क्षेत्रामधून हे हत्ती बाहेर पडले होते. बरे, हत्तींच्या या अशा फेरफटक्याबद्दल पर्यावरण तसेच वन मंत्रालयाकडून कोणत्याही प्रकारची पूर्वसूचना वगैरे काहीही प्रसृत करण्यात आलेली नव्हती"... या घटनेनंतर तीनच वर्षांनंतरचे चित्र - हत्तीला भारताचा 'नॅशनल हेरिटेज ॲनिमल' हा बहुमान प्रदान करण्याची घोषणा केंद्र सरकारच्या वतीने करण्यात आली.



'हत्ती' या प्राण्याशी संबंधित अशी ही दोन चित्रे आणि असा हा त्या दोन चित्रांमधील विसंवाद. केवळ हत्तीच नाही तर, जंगली प्राणी आणि मनुष्य प्राणी यांच्यातील या झगड्याचा संपूर्ण प्रश्नच या विसंवादात गुरफटलेला आहे. कधी हा संघर्ष शहराच्या मध्यवस्तीत घुसलेल्या बिबट्यांच्या रूपाने समोर येतो; तर, कधी भक्ष्याच्या शोधार्थ नागरी वस्तीजवळ आपला तळ हलविणा-या माकडे अथवा वांदरांच्या टोळ्यांच्या माध्यमातून. कधी कुठे अचानकच मोठ्या प्रमाणावर मोरांची हत्या झाल्याच्या बातम्या येतात, तर कधी जंगलाच्या मेरेवरील लोकवस्त्यांमध्ये अवतरलेल्या अस्वलांच्या हल्ल्यात जखमी झालेल्यांच्या वार्ता वाचावयास मिळतात. एरवी जंगलात वास करणारे प्राणी आणि मनुष्य प्राणी यांच्यातील हिंसक, रक्तपाती आदानप्रदानाच्या घटना आताशा अधिकाधिक मोठ्या प्रमाणावर आणि वाढत्या सघनतेने घडत असल्याचा अनुभव येतो. सुदैवाने, केंद्रीय वन आणि पर्यावरण मंत्री जयराम रमेश यांनी, निदानपक्षी, हत्ती आणि माणूस यांच्यातील संघर्षांच्या मालिकेवर पुरेशा अभ्यासांती धोरणात्मक उपाययोजना सुचविण्यासाठी २०१० सालातील फेब्रुवारी महिन्यात एका अभ्यासगटाची नियुक्ती केली. या अभ्यासगटाने आपला अहवाल ३१ ऑगस्ट २०१० रोजी सादर केला. या अहवालात सुचविण्यात आलेल्या शिफारशी व तरतुदींबाबत सध्या वेगवेगळ्या व्यासपीठांवरून साधकबाधक चर्चा सुरू आहे.

माणूस आणि वन्य प्राणी आमनेसामने आल्याने त्यांच्यादरम्यान संघर्ष होण्याच्या घटना आताशा जगाच्या वेगवेगळ्या भागांमध्ये वारंवार घडत असल्याचे प्रकर्षाने ध्यानात येते. परंतु, त्यातल्या त्यात हत्ती आणि मानव यांच्यातील झगडे हे दक्षिण आशियाई देशांच्या जणू पाचवीलाच पुजलेले आहेत. एकट्या श्रीलंकेतच २००७ या एका वर्षात सुमारे २०० हत्तींची हत्या झाली. अन्नाच्या शोधात मानवी वस्तीजवळ आलेल्या आणि पिकांकडे मोहरा वळविणा-या हत्तींपायी हातातोंडाशी आलेल्या पिकांचा फन्ना उडाल्याने हतबल झालेल्या शेतक-यांच्या संतापाला यापैकी बहुसंख्य हत्ती बळी पडले होते. आशिया खंडातील एकूण हत्तींपैकी जवळपास ६० टक्के हत्ती एकट्या भारतातच वस्तीस असल्याने हत्ती आणि मानव संघर्षाची इथली गाथा अधिक बहुआयामी असावी, हे ओघानेच येते.

**वाढता विकास, वाढता संपर्क, वाढते संघर्ष...**

एका परीने हा सगळा वाढत्या-विस्तारत्या भौतिक-आर्थिक-औद्योगिक विकासाचा परिपाक आहे. वाढत्या लोकसंख्येबरोबरच अन्नधान्याची गरज वाढते आहे. साहजिकच, अधिकाधिक जमीन लागवडीखाली आणणे अनिवार्य होऊन बसते. त्यापायी जंगलांवर आक्रमण आणि जंगलतोड होते. शेतीबरोबरच मानवी वस्तीचाही विस्तार होतो. वस्ती विस्तारली की रस्तेबांधणी आणि दळणवळण सुरू होते. ऊर्जानिर्मितीला प्रारंभ होतो. निर्माण झालेल्या विजेचे दूरवर वहन करण्यासाठी खांबांचे जाळे उभारावे लागते. त्यासाठी पुन्हा जमीनच हवी असते. छत्तीसगड, ओडिशा, कर्नाटक, झारखंड यांसारख्या राज्यांत खाणउद्योग सध्या जोरात आहे. अशासारख्या उद्योगांमुळेही वनजमिनींवर माणसाचे चलनवलन वाढते आहे. मोठे, अवाढव्य सिंचन प्रकल्प, धरणे यांपायीही जंगलांखालील जमीन जाते. याच्या जोडीने अन्य मानवी गरजा आहेतच. आजमितीस आपल्या देशात अदमासे १५ कोटी लोकांची उपजीविका प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे जंगलांवरच निर्भर आहे. घरातील गुरे चारण्यापासून ते इंधनांपर्यंत नाना गोष्टींसाठी हे जनसमूह वनसंपदेवर विसंबून आहेत. बांबू, मध, डिंक, गवत, तेंदूची पाने यांसारख्या किरकोळ वनउपज जिनसांचे संकलन आणि त्यांची विक्री हे अनेक कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचे साधन ठरते. वनौषधींसाठीही जंगलांवरच अवलंबून असणारे जनसमूहही बहुसंख्य आहेत.

एकीकडे वनक्षेत्राची हानी झपाट्याने होत असल्याने या समूहांच्या जगण्याचा झगडा अधिकाधिक तीव्र बनतो आहे. दुसरीकडे, वनक्षेत्रांचे परीघ आकुंचन पावत असल्याने हत्तींसारख्या विशालकाय प्राण्यांची उपजीविकाही धोक्यात येते आहे. आक्रसत असलेल्या वनक्षेत्रावर, त्यामुळे, हत्ती आणि माणूस यांची आमनेसामने मुलाखत होण्याच्या घटना आताशा वाढताना दिसतात. संकोचणा-या वनक्षेत्रांवर दोघांचेही अस्तित्व अवलंबून असल्याने त्यांच्या संपर्काचे प्रमाण वाढते आहे. माणसे जंगलांत खोलवर जात आहेत. तर, चारापाण्यासाठी जंगलांतून बाहेर पडून हत्ती मानवी वस्त्यांकडे मोहरा वळवू लागले आहेत. या वाढत्या संपर्काची परिणती दोघांमधील संघर्षाची वारंवारता आणि तीव्रता वाढण्यात होते आहे.



हत्ती आणि माणूस यांच्यादरम्यानचे हे संघर्ष, साहजिकच, रक्तरंजित आहेत ही या सगळ्यांतील चिंतेची मोठी बाब होय. आपल्या देशातील परिस्थिती बघितली तर दरवर्षी सरासरी ४०० व्यक्तींना आणि जवळपास १०० हत्तींना या लढाईत प्राण गमवावे लागतात. परंतु, हानीचे हे झाले केवळ एक रूप. हत्ती आणि माणूस यांच्या संघर्षाचे दुसरे परिमाण आहे आर्थिक. खाद्याच्या शोधार्थ जंगलाच्या सीमांबाहेर पडलेले हत्ती शेजारील वस्तीकडे वळतात ते शेतात उभ्या असलेल्या पिकांकडे आकर्षित होऊन. या पिकांचा फन्ना उडाल्याने जंगल परिसरातील शेतकरी समूहांची नेमकी किती हानी दरवर्षी होते यांबाबतची विश्वसनीय आणि नेमकी आकडेवारीदेखील आपल्या देशात उपलब्ध होत नाही. एका अंदाजानुसार, हत्तींनी भेट दिल्यामुळे दरवर्षी देशभरात सुमारे ८० लाख ते एक कोटी हेक्टर एवढ्या प्रचंड क्षेत्रावरील पिकांची हानी होते. तांदूळ, ज्वारी-बाजरीसारखी भरड तृणधान्ये, डाळी व तेलबियांसारख्या अन्नधान्य पिकांची या गजस्वारीमुळे वाट लागतेच, पण, तुलनेने अधिक हानी होते ती ऊस आणि केळी यांच्यासारख्या नगदी फळांच्या बागांची. ऊस आणि केळी हे तर हत्तींना अतीव प्रियच !

शेतात उभ्या असलेल्या पिकांकडे हत्तींनी आपला मोहोरा वळविल्याने हातातोंडाशी आलेल्या पिकांच्या होणा-या हानीची, तुलनेने, सर्वाधिक तीव्रता जाणवते ती लहान व सीमान्त शेतक-यांना. या शेतक-यांच्या शेतीची उत्पादकता मार खाते. त्यामुळे उत्पादन घटते. उत्पादनात खोट आली की उत्पन्न खालावते. परिणामी, या शेतकरी समूहांच्या हलाखीत भर पडते. या समाजघटकांची, त्यामुळे, थेट अन्नसुरक्षाच धोक्यात येते. संरक्षित वनक्षेत्रांच्या परिसरात वास करणा-या दक्षिण भारतातील शेतकरी समूहांच्या वार्षिक एकंदर शेतीउत्पादनापैकी सरासरीने १५ टक्के उत्पादन हत्तींच्या स्वारीपायी खस्त होते, असे एका अभ्यासाचे निरीक्षण आहे. या सगळ्याचा आणखी एक सहजासहजी ध्यानात न येणारा पैलू आहे. हत्तींच्या मुखात उभी पिके जाऊ नयेत यासाठी या जनसमूहांना पिकांचे रक्षण करण्यासाठी पुन्हा पदराला खार लावावा लागतो. हा खारही पुन्हा दोन प्रकारचा - एक तर कुंपणासारख्या उपायांची योजना करावयाची आणि दुसरे म्हणजे पिकांच्या राखणीसाठी वेळ व्यय करायचा. ***(पृष्ठ २९ पाहावे)***

# जीवनमृत्यूच्या सीमारेषेवर....

'जगणं-मरणं एका श्वासाचं अंतर' असे कवयित्री बहिणाबाई चौधरींनी म्हटल्याला अनेक दशके लोटली आहेत. हे एका श्वासाचे अंतर नेमके असते तरी कसे, म्हणजे त्या एका क्षणी मेंदूत नेमके काय घडते, हा आता आधुनिक मेंदूसंशोधनाचा विषय बनला आहे. माणसाच्या सर्व दैनंदिन व्यवहारांवर मेंदूचे नियंत्रण असते, असे आधुनिक मेंदूसंशोधनाने सिद्ध केले आहे. त्यामुळे जीवनमृत्यूच्या सीमारेषेवर मेंदूचे वर्तन कसे असते हा विषय संशोधकांसाठी खचितच महत्त्वाचा ठरला आहे. आपले कार्य संपूर्णपणे थांबविण्याआधी मेंदूची शेवटची कृती कोणती असते, ते या संशोधनाद्वारे समजून घेण्याचाही संशोधकांचा प्रयत्न आहे.

वॉशिंग्टन येथील जॉर्ज वॉशिंग्टन विद्यापीठातील डॉ. लखमीर चावला आणि त्यांच्या सहका-यांनी असा एक अभ्यास केला आहे. आयुष्याच्या शेवटच्या घटका मोजणा-या काही रुग्णांना कृत्रिम श्वसनयंत्रणेवर ठेवण्यात आले असताना त्यांच्या मेंदूतील हालचालींची नोंद घेण्यात आली. त्यानंतर कृत्रिम श्वसनयंत्रणा बंद करताक्षणीच पुन्हा मेंदूच्या हालचालींची नोंद घेण्यात आली. तेव्हा असे आढळले की, रुग्णांची हृदयक्रिया बंद पडून रक्तदाबही कमी झाला तेव्हा मेंदूत एक विशिष्ट प्रकारची हालचाल दिसून आली. ही हालचाल म्हणजे एक 'ब्रेन व्हेव्ह' होती. सुमारे ३० ते १८०



सेकंद म्हणजे अर्धा मिनिट ते ३ मिनिटांपर्यंत ही 'ब्रेन व्हेव्ह' टिकली/टिकू शकते. अशी 'ब्रेन व्हेव्ह' निर्माण होणे म्हणजे हृदयाला जिवंत करण्याचा हा मेंदूचा कदाचित शेवटचा असा एक असफल प्रयत्न असावा, असे मत संशोधकांनी मांडले आहे. मेंदूने असा प्रयत्न करणे हीच जीवनमृत्यूची सीमारेषा मानता येईल का, असाही विचार इथे पुढे आला आहे.



या संदर्भात उंदरांवर काही प्रयोग करण्यात आले आहेत. काही औषधांच्या चाचण्यांसाठी उंदरांना ठार मारणे गरजेचे ठरते. तेव्हा चाचण्यांचा नेमका परिणाम समजून यावा यासाठी उंदरांना गुंगीचे औषध देऊन ठार करणे शक्य नसते. अशा वेळी उंदरांचा शिरच्छेद करणे हे कितपत योग्य ठरते अशी चर्चा पुढे आली. म्हणून, उंदरांचा शिरच्छेद केल्यानंतर काही क्षणांत त्यांच्या मेंदूच्या कार्यात कसकसे बदल झाले ते नोंदण्यात आले. मेंदूला होणारा रक्तपुरवठा थांबल्याबरोबर मृत होण्याआधी काही क्षणांसाठी उंदीर बेशुद्धावस्थेत जातात. त्यामुळे या हत्याप्रकाराला अयोग्य ठरविण्यात येऊ नये असे काही संशोधकांचे मत आहे. त्या वेळी असेही दिसून आले की, ज्या उंदरांचा शिरच्छेद ते जागे असताना करण्यात आला होता अशा उंदरांच्या मेदूमध्ये शिरच्छेद केल्यानंतर सुमारे ५० सेकंदांनी एक 'ब्रेन व्हेव्ह' दिसून आली, ती अल्प काळ म्हणजे फक्त १० सेकंद टिकली. ज्या उंदरांचा शिरच्छेद गुंगीचे औषध दिल्यानंतर करण्यात आला होता त्यांच्या मेंदूत शिरच्छेदानंतर सुमारे ३० सेकंदांनी अशीच अल्पकाळ टिकलेली 'ब्रेन व्हेव्ह' निर्माण झाल्याचे आढळून आले.

मेंदूचे कार्य अब्जावधी मज्जापेशींच्या कार्यामुळे घडून येते आणि मज्जापेशींचे कार्य विद्युत-रासायनिक संदेशांमुळे घडते. संदेशांच्या देवाणघेवाणीचे हे कार्य अतिशय गुंतागुंतीचे आहे. संदेशांच्या देवाणघेवाणीचे हे कार्य संपूर्णपणे थांबले की मेंदूचे कार्य पूर्णपणे थांबले असे म्हणता येते. मृत्यूच्या वेळी 'ब्रेन व्हेव्ह' आढळणे हा एकप्रकारे मज्जापेशींच्या संदेशांच्या देवाणघेवाणीचा अंत होय.

अशी 'ब्रेन व्हेव्ह' निर्माण होऊन मावळल्यानंतर काहीही केले तरी हृदय व मेंदू पुन्हा पूर्ववत होऊ शकत नाही, असे मत आजपर्यंतच्या संशोधनांवरुन मांडण्यात येत आहे. त्यामुळे या 'ब्रेन व्हेव्ह'ला 'वेव्ह ऑफ डेथ' असेही संबोधले गेले आहे. उंदरांच्या प्रयोगात जशी 'ब्रेन व्हेव्ह' दिसून आली तशीच 'ब्रेन व्हेव्ह' माणसांच्याबाबतीतही दिसून आली असली तरी याबाबत अद्याप ठामपणे काही विधान करणे अवघड आहे, असे संशोधकांचे मत आहे. ■■

*(पृष्ठ ४ वरून)*

कुटीर रुग्णालयात रुग्ण पोहचल्यावर त्याला काय त-हेची आरोग्यसेवा मिळते हे पाहणेही आवश्यक आहे. यासाठी काही मुद्दे सुचविले आहेत.

(१) 'सायकल-ॲम्ब्युलन्स'ने रुग्ण पोहचण्याचे जास्तीत जास्त अंतर ५ ते ८ किलोमीटर असावे. म्हणजेच कुटीर रुग्णालये जागोजागी असणे आवश्यक आहे. सरकार याबाबत काय प्रयत्न करणार आहे किंवा करीत आहे ?

(२) कुटीर रुग्णालये म्हणजे चार भिंती व छप्पर असलेली इमारत हे इथे अभिप्रेत नाही. त्यामध्ये रग्णसेवेसाठी आवश्यक अशी सर्व साधनसामग्री, उपकरणे, औषधे, खाटा, ऑक्सिजन इत्यादी तेथे उपलब्ध असायला हवीत. ब-याच वेळा तातडीला लागणारी नेहमीची औषधे रुग्णालयात नसतात.

(३) ही सुविधा पुरविण्यासाठी लागणारे मनुष्यबळ म्हणजेच आया, परिचारिका व डॉक्टर यांची रुग्णालयात आवश्यक असलेली उपस्थिती.

(४) हल्ली गावागांवतून महिला बचत गटांचे कार्य चांगले चालू आहे. या गटांमधून काही महिलंना परिचारिका/आयाचे प्रशिक्षण देण्याची सोय फक्त सरकारनेच नव्हे तर गावोगावच्या शिक्षणसंस्थांनी सामाजिक बांधिलकी म्हणून अत्यल्प शुल्कात करायला हवी.

(५) ग्रामीण भागात जायला डॉक्टर तयार नसतात ही नेहमीची रड आहे. अशी नकारघंटा वाजविणा-या डॉक्टरकडून सरकारने दंड गोळा केला असला तरी त्यावर समाधान न मानता ग्रामिण भागासाठी डॉक्टर कसे उपलब्ध होतील हेही पाहिले पाहिजे. यासाठी डॉक्टरकीचा परवाना देण्यापूर्वी प्रत्येक डॉक्टरने किमान दोन वर्षे ग्रामीण भागांत काम करणे अनिवार्य करायला हवे. त्या शिवाय परवाना नाहीच हेच ध्येयवाक्य असावे. दंडाची तरतूद करायची झाल्यास त्याची रक्कम सध्याच्या पाच लाखावरून पंचवीस लाख रुपये करावी.

(६) एखाद्या वर्षापूर्वी एमबीबीएसच्या अभ्यासक्रमाचे विभाजन करून एक तीन वर्षांचा व एक पाच वर्षांचा अभ्यासक्रम करावा यावर चर्चा झाली



होती. या तीन वर्षांच्या अभ्यासक्रमात ग्रामीण भागात लागणा-या सर्व आरोग्यसुविधांचे शिक्षण द्यायला हवे.

विशेषतः प्रदूषित पाण्याने होणारे आजार, सर्पदंशावरील उपचार, जखमांवरील प्राथमिक उपचार, रक्तदाब, मधुमेह, ताप-सर्दी-खोकला यांवरील औषधे इत्यादींबाबत प्राधान्याने शिकविण्यात यावे.

(७) तालुका रुग्णालयात किमान दोन ते तीन डॉक्टर असावेत व त्या रुग्णालयास एक मोटरबाईक द्यावी. दररोज एका डॉक्टरने आरोग्यसेवा नसलेल्या गावांतून आळीपाळीने जाऊन तेथे प्राथमिक आरोग्यसेवा पुरवावी. त्याच्याबरोबर औषधे, इंजेक्शने, प्रथमोपचार पेटी असावी. यामुळे रुग्णांना वैद्यकीय सेवा उपलब्ध होईल व शिकाऊ डॉक्टरांना ग्रामीण भागातील हा अनुभव उपयुक्त ठरेल.

(८) आरोग्यसेवेशी अत्यंत निगडित असलेला महत्त्वाचा घटक म्हणजे स्वच्छ व मुबलक पाण्याची उपलब्धता होय. रुग्णालयास स्वच्छ पाण्याचा पुरवठा असणे गरजेचे आहे. यासाठी सरकारने योग्य ते प्रयत्न करावेत.

(९) आरोग्यसेवेशी जोडला जाऊ शकेल असा एक वेगळा मुद्दा आहे तो श्रीमंत देवस्थानांचा. भाविकांच्या भक्तीमुळे अनेक देवस्थाने श्रीमंत झाली आहेत. सोन्याचे मुकुट, सिंहासने, दागिने अशा भेटी त्यांना भक्तांकडून मिळत असतातच. शिवाय, रोख देणग्याही मिळत असतात. अशा देवस्थानांकडून कधी कधी भाविकांसाठी अन्नछत्रे, पाणपोया इत्यादी उपक्रम चालविले जातात. या देवस्थानांनी ग्रामीण भागातील किमान दोन कुटीर रुग्णालयास काही आरोग्यसुविधा पुरविण्याचा संकल्प करावा.

त्याचप्रमाणे मुंबई-पुण्यासारख्या काही मोठ्या शहरांमधील गणेशोत्सव मंडळेही अशीच श्रीमंत झाली आहेत. त्यांनीदेखील कुटीर रुग्णालयांना लागणारी उपकरणे, औषधे, साहित्य दरवर्षी पुरविण्याचा संकल्प केल्यास त्यांचा तो सामाजिक बांधिलकीचा एक उपक्रम ठरेल.

'सायकल-ॲम्ब्युलन्स'द्वारे रुग्ण कुटीर रुग्णालयापर्यंत पोहचला तरी त्याला योग्य अशी आरोग्यसेवा मिळणे गरजेचे आहे, याचा विचार व्हायला हवा.

**सुधीर ब. देशपांडे, विलेपार्ले, मुंबई.**

## दृष्टिक्षेप

# वर्षभरातील कामाचा लेखाजोखा
# (एप्रिल २०१० ते मार्च २०११)

'अर्थबोधपत्रिके'चा प्रत्येक अंक म्हणजे संपादक मंडळाची जणू परीक्षाच असते. आजवरच्या १२-१३ वर्षांमध्ये खास 'अर्थबोधपत्रिके'चा म्हणून असा एक विचक्षण वाचक वर्ग निश्चितच तयार झालेला आहे. एकूणांत त्याचा संख्यात्मक आकार किती आहे, हा भाग वेगळा. परंतु, एका वेगळ्या धर्तीच्या वाचनसंस्कृतीला सरावलेल्या वाचकांची जिज्ञासा भागविण्यासाठी दरवेळी काही तरी रोचक-पाचक-(ज्ञान)बलवर्धक असे वाचनसाहित्य नव्याने परगुणणे ही संपादक मंडळाची कसोटीच असते. या कसोटीस उतरण्याचा प्रयत्न करीत असताना, सरलेल्या वर्षात आपण कोणकोणत्या ज्ञान तसेच माहितीच्या प्रांतांतून भटकंती केली याचा धावता लेखाजोखा मांडणे अनाठायी ठरू नये. त्या दृष्टीने, 'अर्थबोधपत्रिके'च्या नवव्या खंडात सादर केलेल्या वाचनसाहित्याचा ताळेबंद इथे मांडला आहे.

**(१) प्रकाशित साहित्य** - एप्रिल २०१० ते मार्च २०११ या वर्षभराच्या काळात प्रकाशित झालेल्या १२ अंकांमध्ये एकंदरीने ७६ लेख समाविष्ट करण्यात आले होते. यांपैकी, सहा लेख हे पुरवणीच्या स्वरूपात प्रसिद्ध करण्यात आलेले होते, तर उर्वरित ७० लेख हे मुख्य अंकात समाविष्ट केलेले होते. 'जिकडेतिकडे' या सदरात अंतर्भूत असलेली चार स्फुटे वेगळीच. वर्षभरात वाचकांनी पाठविलेली सात पत्रेही या अंकांत प्रकाशित करण्यात आली. पत्रांच्या माध्यमातून वाचकांची मते, प्रतिक्रिया वाढत्या प्रमाणात कळाव्यात अशी इच्छा नेहमीच असते. मात्र, २००९-१० या सालाप्रमाणेच २०१०-११ या वर्षीही वाचकपत्रांची संख्या अगदी मोजकीच राहिली. विविध लेखांद्वारे ज्या अभ्यासप्रांतांची सफर आपण केली त्यांचा आलेख पुढील तक्त्यात सादर केला आहे. एकूण १७ प्रांतांतील घडामोडींचा विविधांगी परिचय करून घेण्याचा प्रयत्न या लेखांद्वारे करण्यात आला.



**अर्थबोधपत्रिका खंड ९ (एप्रिल २०१० -मार्च २०११)**
**प्रकाशित लेखांचे विषयवार वर्गीकरण (एकूण लेखसंख्या -७६)**

| अ. क्र. | विषय | लेखसंख्या | लेखांमधील विषय |
|---|---|---|---|
| १ | सामाजिक | ०५ | डॉ. राम मनोहर लोहिया यांचे आर्थिक विचारविश्व, वित्तीय अरिष्ट आणि रोजगार, लेपचा नागरिकांचा प्रश्न, सामाजिक मनीऑर्डरी, वाळ्वंटातील नवशहरे. |
| २ | आर्थिक | ०७ | मंदीपासून शिकावयाचे धडे, सेवाक्षेत्राची जडणघडण, क्रेडिड कार्डे आणि कर्जवाटप, जीडीपी आणि विकासाचे मोजमाप, कडधान्यांचे घटते उत्पादन, चीन व अमेरिकेदरम्यानचे चलनीयुद्ध, भारतातील प्रचलित आर्थिक वास्तव. |
| ३ | राजकीय | ०७ | आंतरराष्ट्रीय दहशतवाद आणि त्याची साधने, जागतिक स्तरावरील शस्त्रास्त्रस्पर्धा, सायबर विश्व आणि राजकीय व्यवस्था, इंडोनेशियातील लोकशाही, चीनमधील धार्मिक स्वातंत्र्य, १३ वा केंद्रीय वित्त आयोग आणि स्थानिक स्वराज्य संस्थांकडे निधीचे हस्तांतरण, सहारावींची चळवळ |
| ४ | पर्यावरण | ०४ | पृथ्वीच्या वाढत्या तापमानाचे मोजमाप, पृथ्वीची सहनशक्ती, प्रदूषण नियंत्रण आणि बेरोजगारी |
| ५ | साहित्य | १२ | नोबेल पुरस्कार अस्तित्वात आल्यापासून साहित्याच्या प्रांतातील गौरवास्पद कामगिरीबद्दल नोबेल पारितोषिक प्रदान केलेल्या स्त्री-लेखिकांचे जीवन व साहित्यिक कारकीर्द यांचा छोटेखानी परिचय |
| ६ | आरोग्य | ०३ | पाणी आणि सार्वजनिक स्वच्छता, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे मध्यावधी मूल्यमापन, स्मृतिभ्रंश आणि त्यावरील उपचार, आफ्रिकेतील सायकल-ॲम्ब्युलन्स |
| ७ | विज्ञान | ०४ | जनुकीय बदलांचे संशोधन, दुर्मिळ खनिजांचा शोध व वापर, नॅनो तंत्रज्ञानाचे वाढते उपयोजन, उत्क्रांतीसंदर्भातील नवसंशोधन |

| अ. क्र. | विषय | लेखसंख्या | लेखांमधील विषय |
|---|---|---|---|
| ८ | राज्य पुनर्रचना | १६ | पुनर्रचनेची पूर्वपीठिका, घटनादत्त तरतुदी, डॉ. आंबेडकरांची भूमिका, पुनर्रचनेद्वारा उद्‌भवणारे प्रश्न, नवनिर्मित राज्यांच्या वित्तीय व्यवस्थेची वैशिष्ट्ये, विकासाच्या अनुशेषाचे मोजमाप, स्वतंत्र तेलंगणाची मागणी आणि तिची पार्श्वभूमी, पुनर्रचनेसंदर्भातील कर्नाटकचे प्रश्न, स्वतंत्र विदर्भाची मागणी आणि विदर्भविकासाचे सद्यचित्र. |
| ९ | शिक्षण | ०५ | मुलामुलींमधील शैक्षणिक तफावत, स्थलांतरितांच्या शैक्षणिक समस्या, शिक्षणासाठी स्थलांतराची प्रवृत्ती, चिनी शैक्षणिक सुधारणा, तांत्रिक शिक्षणातील सुधारणा |
| १० | तंत्रज्ञान | ०३ | महाजाल आणि सोशल नेटवर्किंग, इंटरनेट आणि त्यातील सुधारणा, स्मार्ट शहरांची निर्मिती. |
| ११ | जलसुरक्षा | ०४ | पीक वॉटर आणि पाण्याची उपलब्धता, वॉटर फूटप्रिंट आणि त्याचे मोजमाप, पाणी आणि सहस्रकाची विकास उद्दिष्टे, पाणीवापर आणि पाणीवाटपासंदर्भातील कायदे. |
| १२ | नागरीकरण | ०१ | चीनमधील वाहतूक कोंडी |
| १३ | कामगार | ०१ | कामगारविश्वात महिलांचा वाढता सहभाग |
| १४ | संशोधन | ०१ | माणसाच्या अभिव्यक्ती माध्यमांतील उत्क्रांती |
| १५ | प्राणीजीवन | ०१ | उंदरांमधील संपर्क आणि संदेशवहन |
| १६ | इतिहास | ०१ | न्या. म. गो. रानडे, न्या. का. त्र्यं. तेलंग आणि न्या. चंदावरकर यांचे कार्यकर्तृत्व |
| १७ | औद्योगिक | ०१ | जैवविविधता, पर्यावरण संवर्धन आणि कॉर्पोरेट विश्व |



**(२) विविध देशांचा फेरफटका** - जागतिकीकरणाच्या आजच्या युगात जगाचे नागरिक बनलेल्या आपल्या सर्वांना जागतिक स्तरावरील विविध घडामोडींची जाणीव असणे हे गरजेचे आहे. त्या नुसार, भारत, रशिया, चीन, अमेरिका, जपान, फ्रान्स, इटली, जर्मनी, ऑस्ट्रेलिया, ब्रिटन, आयर्लंड, टर्की, पाकिस्तान, स्वीडन, नायजेरिया, नॉर्वे, लॅटिन अमेरिका, दक्षिण आफ्रिका, पोलंड, ऑस्ट्रिया, रु मानिया, अबुधाबी, पोर्तुगल, नेदरलँड्स्, इजिप्त, इंडोनेशिया, इस्त्रायल, मोरोक्को, झांबिया, उत्तर आफ्रिका तसेच युरोपीय समुहातील देश इत्यादी ३१ देशांमधील विविध घटना-घडामोडींवर आधारित लेख प्रसिद्ध करण्यात आले.

**(३) विशिष्ट विषयांवर प्रकाश टाकणारे अंक** - 'अर्थबोधपत्रिके'चा शक्यतो एकाआड एक अंक हा एखाद्या विविक्षित विषयाच्या सांगोपांग विवेचनास प्राधान्य देणारा असावा, असा प्रयत्न अलीकडील काही वर्षे सुरू आहे. त्यानुसार, २०१०-११ या वर्षात अशा स्वरूपाचे सहा अंक वाचकांना सादर करता आले, याचे समाधान आहे. जल-जीवन विशेष (मे २०१०), शिक्षण (जुलै २०१०), राज्य पुनर्रचना (ऑक्टोबर २०१०), नोबेल पुरस्कार विजेत्या महिला साहित्यिक (नोव्हेंबर २०१०), लोकशाही विशेष (जानेवारी २०११) आणि आजचा विदर्भ विशेषांक (मार्च २०११) हे ते सहा अंक होत.

**(४) संदर्भ साहित्यः** सन २०१०-११ या वर्षभरादरम्यान प्रसिद्ध झालेल्या १२ अंकांतील वाचनसाहित्य निर्माण करण्यासाठी वापरण्यात आलेल्या आधारभूत साहित्याचे स्त्रोतनिहाय वर्गीकरण पुढीलप्रमाणेः

**(अ) देशी-विदेशी अशी एकूण १२ नियतकालिके** - जिऑग्राफिकल, नेचर, इकॉनॉमिस्ट, न्यू सायंटिस्ट, न्यू स्टेटस्‌मन, बीबीसी वाइल्डलाइफ, डाउन टू अर्थ, जर्नल ऑफ डेमॉक्रसी, करंट सायन्स, ॲप्रोप्रिएट टेक्नॉलॉजी, बिझनेस टुडे आणि ऑस्ट्रेलियन ह्यूमॅनिटिज् रीव्ह्यू ही ती नियतकालिके.

**(ब) पुस्तके/अहवाल** - : भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या समृद्ध ग्रंथालयातील एकंदर २४ ग्रंथ तसेच/अथवा अहवालांचा आधार २०१०-११ या वर्षातील वाचनसाहित्य तयार करण्यासाठी घेण्यात आला.

**(क) संस्थळे (वेबसाइटस्) :** विविध अशा एकूण ४९ संस्थळांवरू न परिष्कृत करू न घेतलेली माहिती या वर्षात सादर करण्यात आली. ■■

*(पृष्ठ २० वरून)*

पिकांच्या राखणीसाठी खर्चाव्या लागणा-या वेळाचीही काही एक 'अपॉर्च्युनिटी कॉस्ट' असते. तीही या मोजदादीमध्ये धरावयास हवी. त्या व्यतिरिक्त पिकांच्या रक्षणासाठी खिशातून पैसा खर्च करावा लागतो तो वेगळाच. कर्नाटकाच्या चामराजनगर जिल्ह्यातील बंदिपूर राष्ट्रीय उद्यानाच्या पाच किलोमीटर अंतराच्या परिघात सुमारे ३० हजार कुटुंबे वास्तव्यास आहेत. खरीपाचे एकच पीक ती घेतात. सर्वसाधारणपणे पाच महिने पिके रानात उभी असतात. या दरम्यान पिकांचे हत्तींपासून संरक्षण करणे गरजेचे ठरते. दर कुटुंबातील किमान एका व्यक्तीला तरी दरदिवशी रात्री पहा-यासाठी जावे लागते. पहा-यासाठीच्या मजुरीचा दर रात्रीचा रोजंदारीचा दर सरासरी १०० रुपये धरला आणि एकूण ३० हजार कुटुंबांपैकी केवळ दोन तृतीयांश कुटुंबेच पहा-याची अशी व्यवस्था करतात असे गृहित धरले तरी एका पिकामागे एका हंगामासाठीच्या या अशा खर्चाची एकूण रक्कम जवळपास २७ ते ३० कोटी रुपयांच्या घरात जाते. ही झाली कथा एकट्या बंदिपूर राष्ट्रीय उद्यानाची. आपल्या देशात अशी अनेक उद्याने आहेत. सगळ्या उद्यानांच्या परिसरातील लोकसमूहांना मोजाव्या लागणा-या अशा खर्चाची मोजदाद केली तर तो आकडा केवढा भरेल याची केवळ कल्पना केली तरी पुरे.

हत्तींचे निवासस्थान असणा-या प्रदेशांच्या परिसरात राहणा-या मानवी वस्त्यांचा हा प्रश्न दक्षिण आशियातील बहुतेक देशांमध्ये आहेच. भारताव्यतिरिक्त श्रीलंका, म्यानमार, थायलंड, इंडोनेशिया, मलेशिया, लाओस, भूतान, कंबोडिया, चीन, बांगला देश, नेपाळ आणि व्हिएतनाम या देशांमध्ये हत्ती बहुसंख्येने आहेत. अभ्यासकांच्या हिशेबानुसार एकट्या भारतातच साधारणपणे २४ हजार ते ३३ हजारांच्यादरम्यान हत्ती आहेत. तर, उपरिनिर्दिष्ट अन्य देशांमध्ये मिळून सुमारे १३ ते १८ हजार हत्ती असावेत असा अंदाज वर्तविला जातो. वन्य पशूंच्या संवर्धन-संगोपनात रस असणा-या संस्थांनी हत्तींच्या संख्येबाबत व्यक्त केलेले अंदाज आणि सरकारी सूत्रांनी पुरविलेली हत्तींच्या संख्येबाबतची आकडेवारी यांत काही देशांमध्ये तफावत आढळते. परंतु, समस्येच्या स्वरूपात मात्र फारसा फरक नाही.



माणूस आणि हत्ती यांच्यातील संघर्ष भारताबाहेरील या देशांमध्येही आजवर सतत झडत आलेला आहे. आजही त्यात खंड नाही. लोकसंख्यावाढ आणि विविध कारणांपायी होणारी जंगलांची हानी, हे या संघर्षाचे मूळ बहुतेक देशांत समानच असल्याचे दिसते. मात्र, हस्तिदंताच्या चोरट्या व्यापारासाठी हत्तींची कत्तल करण्याचा सपाटा भारतासह थायलंड, कंबोडिया आणि चीन या देशांमध्ये सरसहा अनुभवास येतो. हत्तींकडून होणा-या पिकांच्या नासधुसीपायी संतापलेल्या शेतक-यांच्या क्रोधाला भारताप्रमाणेच श्रीलंका आणि कंबोडियातील हत्तीही बळी पडताना दिसतात. तर, देशांतर्गत वांशिक संघर्ष आणि यादवींदरम्यान पेरण्यात आलेल्या भूसुरुंगांचे स्फोट होऊन त्यांत हत्तींचा घात मोठ्या प्रमाणावर होण्याच्या घटना श्रीलंका, कंबोडिया आणि व्हिएतनाम या देशांत प्रकर्षाने आढळून येतात.

केंद्रीय वन व पर्यावरण खात्याने नियुक्त केलेल्या कृतिगटामुळे या एका संवेदनशील विषयाच्या चर्चेला निदान आता तोंड तरी फुटले आहे, हे काय कमी म्हणायचे ! ■■

**मौज प्रकाशन गृह आणि भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी यांच्या संयुक्त विद्यमाने नवे प्रकाशन**

**उदारमतवादाच्या संस्कृतीचे बीजारोपण करीत १९व्या शतकातील भारतीय प्रबोधनास आकार देणा-या रानडे-तेलंग-चंदावरकर या तीन लोकोत्तर व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाचा विश्लेषक आलेख**

## तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ

**लेखक - नरेन्द्र चपळगावकर**

**पृष्ठे : ३१५ किंमत : ३००/- रुपये**

**समाजपुरुषांचा वारसा आणि वसा यांचे उचित भान आणून देणारा संशोधनपूर्ण वाचनीय दस्तऐवज**

# अर्थबोधपत्रिका पुरवणी

## आव्हान महागाईचे आणि तुटीच्या व्यवस्थापनाचे

केंद्रीय अर्थमंत्री प्रणव मुखर्जी यांनी सन २०११-१२ या वित्तीय वर्षासाठी सादर केलेल्या अर्थसंकल्पाची व्यापक पार्श्वभूमी प्रथम समजावून घेणे इष्ट ठरेल. २००८ सालातील सप्टेंबर महिन्यापासून जगभरात उद्‌भवलेल्या वित्तीय अरिष्टाच्या ज्या झळा भारतीय अर्थव्यवस्थेस पोहोचल्या होत्या, त्या झळांमधून आपल्या देशाची अर्थव्यवस्था चांगल्यापैकी सावरलेली असल्याच्या आश्वासक खुणा आता दिसू लागलेल्या आहेत. अमेरिकेसह अनेक युरोपीय देशांमधील बाजारपेठांमध्ये आज जी परिस्थिती दिसते तिच्या बरोबर विरुद्ध परिस्थिती भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये नांदताना दिसते. अर्थव्यवस्थेत ठाण मांडून बसलेल्या 'डिफ्लेशन'चा सामना कसा करावयाचा याची भ्रांत प्रगत देशांमधील अर्थव्यवस्थापकांना सध्या सतावते आहे. आपल्या देशातील चित्र मात्र वेगळे दिसते.

---

***दरवर्षी सादर केल्या जाणा-या केंद्रीय अर्थसंकल्पाला अनुलक्षून 'आयबीएस् पुणे' या संस्थेच्यावतीने 'येस्, फायनान्स मिनिस्टर' या शीर्षकाखाली एका परिसंवादाचे आयोजन करण्यात येते. सन २०११-१२ या वित्तीय वर्षासाठी केंद्रीय अर्थमंत्री प्रणव मुखर्जी यांनी २८ फेब्रुवारी २०११ रोजी सादर केलेल्या अर्थसंकल्पावरील परिसंवाद गुरुवार, ३ मार्च २०११ रोजी पुण्यात आयोजित करण्यात आला होता. येस् बँकेच्या उपाध्यक्ष आणि प्रधान अर्थतज्ज्ञ डॉ. शुभदा राव यांनी या परिसंवादादरम्यान केलेल्या सादरीकरणावर आधारित हा लेख 'अर्थबोधपत्रिके'च्या वाचकांसाठी या ठिकाणी प्रस्तुत केला आहे.*** ■ ***संपादक***



महागाईवर नियंत्रण ठेवणे हे सरकारसमोरील सध्याचे मुख्य आव्हान होय. या आघाडीवर सरकारला येत्या वित्तीय वर्षात कितपत यश येते त्यावर वित्तीय तुटीचे व्यवस्थापन करण्याबाबतचा जो एक 'रोड मॅप' सरकारने अर्थसंकल्पाद्वारे समोर मांडलेला आहे त्याची फलश्रुती अवलंबून राहील. इथे लक्षात घेण्याजोगा भाग असा की, महागाईशी संबंधित असलेल्या दोन मुख्य घटकांपैकी एक घटक हा आपल्या अखत्यारीबाहेरचा आहे. तो घटक आहे खनिज तेलाच्या पुरवठा व दरवाढीचा. दुसरे म्हणजे, विकसित देशांमधील वित्तीय परिस्थिती, अमेरिका व काही युरोपीय अर्थव्यवस्थांमध्ये ठाण मांडून बसलेली आर्थिक मंदी आणि ही मंदी दूर करण्यासाठी त्या अर्थव्यवस्थांमध्ये अवलंबिण्यात येत असलेले उपाय यांचाही संबंध आपल्या देशातील महागाईशी असणार आहे.

आजचे चित्र असे आहे की, वित्तीय अरिष्टाच्या विळख्यातून जागतिक अर्थव्यवस्था हळूहळू मान वर उचलत असल्याचे अनुभवास येत असले तरी युरोपीय समुदायातील देश आणि अमेरिका अजूनही मंदीशी झगडते आहे. जागतिक अर्थव्यवस्थेमधील पुनरुत्थानाला मिळत असलेला टेकू हा मुख्यतः चीन व भारत या दोन अर्थव्यवस्थांकडून लाभलेला आहे. पोर्तुगल, आयर्लंड, ग्रीस आणि स्पेन यांसारख्या अर्थव्यवस्था वाढत्या कर्जाच्या भारामुळे चिंतित आहेत. तर, घसरण रोखली गेलेली असली तरी अमेरिकी अर्थव्यवस्थेमधील बेरोजगारीच्या समस्येची तीव्रता अजूनही ओसरलेली नाही. याचा मुख्य परिणाम असा दिसतो की, जगाच्या विकसित भागातील अर्थव्यवस्था आणि जगाच्या विकसनशील पट्ट्यातील अर्थव्यवस्था अवलंबत असलेल्या पैसाविषयक धोरणांची दिशा परस्परांच्या थेट विरुद्ध आहे.

विकसित देशांसमोर समस्या आहे ती चलनक्षयाची (डिफ्लेशन) तर, आशिया खंडातील विकसनशील देशांसमोर प्रश्न आहे तो महागाईचे (इन्फ्लेशन) नियंत्रण करण्याचा. 'डिफ्लेशन'चा सामना करण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून विकसित देश उदार व विस्तारपूरक अशा पैसाविषयक धोरणांचा (लिबरल मॉनेटरी पॉलिसी) अवलंब करताना दिसतात तर, भाववाढ रोखण्यासाठी कठोर अशी पैसाविषयक धोरणे अवलंबण्याखेरीज विकसनशील देशांना पर्यायच नाही.

**'करन्सी वॉर' आणि 'ॲसेट बबल्स'**

त्याच वेळी, अमेरिका आणि चीन यांच्यादरम्यानचे भरात आलेले चलनी युद्ध (करन्सी वॉर) ओसरण्याची चिन्हे अजूनही दिसत नाहीत. अमेरिकी डॉलरच्या तुलनेत चिनी येन चीनने कृत्रिमरीत्या अवमूल्यित (अंडरव्हॅल्यूड) ठेवलेला आहे. त्यामुळे, व्यापार तोलाचा विचार केला तर अमेरिकेच्या चालू खात्यावर सतत तूट तर चीनच्या खात्यावर सततच आधिक्य दिसते. चिनी निर्यातीला बाधा उत्पन्न होऊ नये म्हणून चीन आपल्या चलनाचे विनिमय मूल्य वाढू देत नाही. अमेरिकी अर्थव्यवस्थेतील मंदी हटविण्यासाठी अमेरिकी मध्यवर्ती बँक अर्थव्यवस्थेत सढळ हाताने पतप्रवाह सोडते आहे. मुळात, तिथे बाजारपेठेतील मागणीच ठप्प होऊन बसलेली असल्याने कर्जाला उठावच नाही. चीन, भारत आणि एकंदरच आशियाई देशांमध्ये भाववाढीचा माहौल असल्याने या अर्थव्यवस्थांमध्ये व्याजांचे सरासरी दरही अधिक आहेत. भांडवल बाजारही तुलनेने तेजीत आहेत. त्यामुळे, विकसित देशांच्या अर्थव्यवस्थांमध्ये सोडल्या जात असलेल्या पतस्त्रोतांचा काही भाग विकसनशील अर्थव्यवस्थांमध्ये अल्पमुदतीसाठी 'पार्क' करून ठेवण्याची प्रवृत्ती अलीकडील काळात प्रकर्षाने दृष्टोत्पत्तीस येते. याचा एक संभाव्य परिणाम म्हणजे विकसनशील देशांमधील शेअर बाजार, जमिनीची बाजारपेठ, बांधकाम उद्योगाचे क्षेत्र (रिअल इस्टेट) अशा क्षेत्रांतील किंमतींमध्ये एकदम फुगवटा आलेला दिसणे.

अशा फुगवट्यांना तांत्रिक परिभाषेत 'ॲसेट बबल्स' असे म्हणतात. अल्पकाळासाठीच गुंतविला गेलेला हा परकीय पैसा पुन्हा त्या त्या देशातील अथवा अन्य देशांतील भांडवल बाजारांकडे वळविला गेला की हे फुगे फट्कन फुटतात. अशा प्रवृत्तींपायी विकसनशील बाजारपेठांमध्ये अल्पकालिक आणि ब-याच अंशी अनाकलनीय चढ-उतार निर्माण होताना दिसतात. दुसरे म्हणजे, परदेशांतून येणा-या अशा भांडवली प्रवाहांपायी स्थानिक अर्थव्यवस्थांमध्ये भाववाढीच्या प्रवृत्तीही सक्रिय बनतात. त्यातल्या त्यात समाधानाची बाब म्हणजे, २०१० सालातील नोव्हेंबर महिन्यानंतर विकसित अर्थव्यवस्थांकडून विकसनशील अर्थव्यवस्थांकडे वाहणारे असे परकीय भांडवली प्रवाह ब-याच अंशी नेमस्त झाल्याचे संबंधित आकडेवारी दर्शविते.



जागतिक स्तरावर, दुसरीकडे, कच्च्या खनिज तेलाच्या किमतींची कमानही अलीकडील काही महिन्यांत पुन्हा चढता कल दर्शवू लागलेली आहे. २०१० सालातील डिसेंबर महिन्यापासून कच्च्या खनिज तेलाच्या बाजारभावांत १० टक्क्यांहून अधिक वाढ घडून आल्याचे अनुभवास येते. मध्य पूर्व तसेच उत्तर आफ्रिकेतील राजकीय अस्थिरता याला प्रामुख्याने कारणीभूत आहे. जागतिक स्तरावरील तेलाचे उत्पादन आणि पुरवठ्याच्या दृष्टीने हे प्रांत महत्त्वाचे ठरतात. यांतच भर पडली ती लिबियातील उठावाची. आंतरराष्ट्रीय स्तरावर कच्च्या खनिज तेलाचे भाव वाढू लागल्याने वित्तीय अरिष्टाच्या बसलेल्या जोरदार फटक्यातून नुकतीच कोठे मान वर उचलू लागलेल्या जागतिक अर्थव्यवस्थेस पुन्हा एकवार दणका बसण्याच्या शक्यता बळकट बनतात. आफ्रिकेतील तेल उत्पादक देशांच्या मालिकेत तेल उत्पादनाच्या दृष्टीने लिबिया हा तिस-या क्रमांकाचा देश. लिबियाचे तेल उत्पादन हे खनिज तेलाच्या जागतिक स्तरावरील राखीव क्षमतेच्या जवळपास एक तृतीयांश इतका भरते. त्यामुळे, लिबियातील राजकीय व लष्करी अस्थैर्य लांबत गेले आणि त्या अस्थिरतेची परिणती तेथील तेल उत्पादनात घट येण्यात घडून आली तर तेलाच्या जागतिक स्तरावरील पुरवठ्यावर त्याचे पडसाद उमटल्याखेरीज राहणार नाहीत. लिबियाकडून होणा-या तेल पुरवठ्यात येऊ शकणारी संभाव्य तूट भरून काढण्याइतपत तेल पुरवठ्याची राखीव क्षमता सौदी अरेबियाकडे आहे ही गोष्ट खरी. परंतु, तेलाच्या जागतिक स्तरावरील पुरवठ्याच्या लेखी महत्त्वाच्या असणा-या एकापेक्षा अनेक देशांमधील पुरवठ्याचे प्रवाह एकाच वेळी बाधित झाले तर एकंदरीने त्याचा प्रतिकूल परिणाम तेलाच्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील तेलाच्या बाजारभावांवर घडून यावा, हे स्वाभाविकच ठरते.

या दरवाढीचे भारतीय अर्थव्यवस्थेवर आणि मुख्यतः वित्तीय तुटीच्या नियंत्रण व व्यवस्थापनावर काय परिणाम घडून येतील हा खरा कळीचा मुद्दा ठरतो. शेतमाल आणि खनिज तेल हे सध्याच्या भाववाढीमागील दोन मुख्य कारणभूत घटक होत. भाववाढीवर अंकुश ठेवण्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेने कठोर पावले उचलली तर त्यांची परिणती व्याजदरांची पातळी उंचावण्यात होऊन गुंतवणुकीवर त्याचे प्रतिकूल परिणाम होतील.

इथे सगळ्यात महत्त्वाचा प्रश्न ठरावा तो या भाववाढीचा वित्तीय तुटीच्या नियंत्रणावर काय परिणाम संभवतो, हा. वित्तीय तुटीचे ठोकळ देशी उत्पादिताशी असणारे प्रमाण २०१०-११ या वित्तीय वर्षात ५.५ टक्के राहील, असा अंदाज केंद्रीय अर्थमंत्री प्रणव मुखर्जी यांनी गेल्या वर्षीच्या फेब्रुवारी महिन्यात अर्थसंकल्प सादर करतेवेळी मांडलेला होता. प्रत्यक्षात, तुटीचे हे प्रमाण ठोकळ देशी उत्पादिताच्या ५.१ टक्का इतके राहील असे सुधारित अंदाज सांगतात. आता, २०११-१२ या वित्तीय वर्षात वित्तीय तुटीचे ठोकळ देशी उत्पादिताशी असणारे प्रमाण ४.६ टक्क्यांपर्यंत खाली उतरविण्याचे उद्दिष्ट केंद्रीय अर्थमंत्र्यांनी त्यांच्या यंदाच्या अर्थसंकल्पीय भाषणादरम्यान समोर ठेवलेले आहे. आता, इथे एक बाब ध्यानात ठेवावयास हवी ती अशी की, २०१०-११ या वर्षासाठीचे वित्तीय तुटीचे ठोकळ देशी उत्पादिताशी असलेले प्रमाण अर्थसंकल्पीय अंदाजाच्या तुलनेत (सुधारित अंदाजानुसार) घटलेले दिसते ते २०१०-११ या वर्षात सरकारच्या गाठी करेतर (नॉन टॅक्स) महसूल अपेक्षेपेक्षा अधिक मात्रेने गोळा झाला म्हणूनच. २०१०-११ या वर्षात अंदाजापेक्षा तब्बल ४९ टक्के अधिक करेतर महसूल सरकारच्या तिजोरीत दाखल झाला तो 'थ्री जी स्पेक्ट्रम'च्या विक्रीद्वारे अपेक्षेपेक्षा बराच पैसा जमा झाला म्हणूनच मुख्यतः.

आता, वित्तीय तुटीचे ठोकळ देशी उत्पादिताशी असलेले प्रमाण २०११-१२ या वित्तीय वर्षात ४.६ टक्क्यांपर्यंत खाली आणण्याचे जे ध्येय सरकारने डोळ्यासमोर ठेवलेले आहे ते गाठत असताना महसूल संकलन आणि भाववाढ हे दोन घटक येत्या वर्षात कोणते रूप धारण करतात त्यावर बरेच काही अवलंबून राहते. एक तर, या वर्षात काही पुन्हा एखादा 'स्पेक्ट्रम'चा लिलाव दृष्टिपथात नाही. त्यामुळे, जो घसघशीत करेतर महसूल २०१०-११ या वित्तीय वर्षात सरकारच्या गाठी जमा झाला त्याची पुनरावृत्ती २०११-१२ या वर्षात होण्याची शक्यता नाही. कर संकलनामध्ये २०११-१२ या वर्षात जी काही वाढ अंदाजित आहे ती निखळ 'टॅक्स बॉयन्सी'च्या माध्यमातून साकारणारी आहे. देशी ठोकळ उत्पादितामध्ये किती वाढ घडून येते त्यावर 'टॅक्स बॉयन्सी'च्या माध्यमातून कितपत वाढीव कर महसूल तिजोरीत जमा होतो ते अवलंबून राहणार आहे.



त्यानुसार महसुली आणि वित्तीय तुटीचे आकारमानही ठरेल. महसुली आणि वित्तीय तुटीचे आकारमान ठरविणारा दुसरा महत्त्वाचा घटक म्हणजे सरकारची अनुदाने. त्यांतही महत्त्वाची दोन अनुदाने म्हणजे अन्नखाद्यांवरील अनुदान व इंधनांवरील अनुदान. खनिज तेलाचे भाव चढतेच राहिले तर इंधनांवरील अनुदानांसाठी २०११-१२ या वर्षासाठीच्या अर्थसंकल्पात केलेल्या तरतुदीमध्ये प्रत्यक्षात वाढ घडून येऊन परिणामी महसुली तसेच वित्तीय तुटीच्या आकारमानात वाढच घडून येईल. त्यामुळे, भाववाढ आणि वित्तीय तुटीचे व्यवस्थापन या येत्या वर्षात सरकारची कसोटी बघणा-या दोन मुख्य बाबी ठरतील. खरे आव्हान तेच राहील. ■■

## निवेदन

'अर्थबोधपत्रिके'मध्ये प्रकाशित करण्यासाठी संशोधनपर लेखनसाहित्य भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीकडे सादर करण्याकडे अलीकडील काळात कल वाढलेला दिसतो. जाणकार, विचक्षण वाचकांना 'पत्रिके'बाबत वाटणा-या आत्मीयतेची, 'अर्थबोधपत्रिके'च्या विश्वसनीयतेची, संशोधनपर वाचनसाहित्याला वाहिलेले गंभीर प्रकृतीचे एक नियतकालिक या 'अर्थबोधपत्रिके'च्या प्रतिमेची जणू पावतीच त्याद्वारे मिळते. मात्र, अशा या लेखनसाहित्याचा अंतर्भाव 'पत्रिके'च्या अंतरंगात करण्यास आम्ही असमर्थ आहोत, याबद्दल सखेद दिलगिरी व्यक्त करण्याखेरीज पर्यायही नाही. एक तर, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेत कार्यरत असलेल्या संपादकीय विभागाने खास 'अर्थबोधपत्रिके'साठीच तयार केलेल्या मजकुराखेरीज अन्य मजकूर अंकात अंतर्भूत करावयाचा नाही, असे धोरण संस्थेने 'पत्रिके'च्या प्रारंभापासूनच अतिशय जाणीवपूर्वक आणि कटाक्षाने जपलेले आहे. तसेच, देश वा राज्य पातळीवरील प्रचलित विषयांचा ऊहापोह करणारे संशोधनपर लेखन प्रकाशित करणारे संशोधनविषयक नियतकालिक, असे 'अर्थबोधपत्रिके'चे स्वरूपही संस्थेस आरंभापासूनच अभिप्रेत नाही. त्यामुळे, प्रकाशन हेतूने संस्थेकडे सादर करण्यात येणारे लेखन स्वीकारण्यास आम्ही असमर्थ आहोत. 'अर्थबोधपत्रिके'वर प्रेम करणारे वाचक संस्थेची ही भूमिका समजावून घेतील, त्याबाबत त्यांचा कोणताही विपरित ग्रह होणार नाही, अशी आशा नव्हे तर खात्री आहे. लोभ आहेच तो उत्तरोत्तर वृद्धिंगत व्हावा, हीच मन:पूर्वक प्रार्थना.

### प्रमुख संदर्भ

**(A) Magazines** : -
(1)The Economist, January 22 nd 2011, A special report on global leaders
(2) Current Science, Volume 99 Number 12, 25 December 2010
(3)NewScientist, 12 February 2011
(4) Economic and Political Weekly, December 4-10, 2010: Elephant Task Force Report, Pages 29-43

**(B) Books/Reports** : - भारतीय संस्कृतिकोश - संपादक पं. महादेवशास्त्री जोशी, खंड ९ - विहार ते सिंधी लोक, भारतीय संस्कृतिकोश मंडळ, पुणे, प्रथमावृत्ती ३० नोव्हेंबर १९७६, पृष्ठ ६६९ ते ६७४

**(C) Websites :-** http://asianelephantstoday.com/2010/10/30factbox-threats-facing-asiasa-endangered-wild-elephants-reutres/ ■■

## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

### 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर, इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.



**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीचे आद्य प्रकाशन**
**आता पुनर्मुद्रित स्वरूपात**

**भारतातील गरिबीच्या समस्येचे स्वरूप तिच्या कारणांसह तपशीलवार उलगडून दाखविणारा दस्तऐवज**

# Poverty in India

**लेखक**

वि.म. दांडेकर नीळकंठ रथ

पृष्ठे १४० किंमत : २००/- रुपये

**अर्थकारण-समाजकारणाचे जिज्ञासू, साक्षेपी संशोधक, प्राध्यापक, विद्यार्थी अशा विविध स्तरांतील वाचकांना उपयुक्त असा मौलिक ग्रंथ**

## 'अर्थबोधपत्रिका' वर्गणीदारांसाठी विशेष योजना

**वार्षिक वर्गणी** फक्त १०० / - रुपये

**द्वैवार्षिक वर्गणी** फक्त १८०/ - रुपये व 'अर्थबोधपत्रिके'चा मेंदूसंशोधन विशेषांक भेट

**त्रैवार्षिक वर्गणी** फक्त २६०/ - रुपये व एक पुस्तिका भेट

**पंचवार्षिक वर्गणी** फक्त ४०० /- रुपये व दोन पुस्तिका भेट

**पुस्तिका -** (१) भारतातील लोकसंख्यावाढीचा प्रश्न : लेखिका - कुमुदिनी दांडेकर (किंमत ३०/-रुपये) (२) सक्तीचे प्राथमिक शिक्षण : (इंग्रजी व मराठी) लेखक - जयकुमार अनगोळ (दोन्हीची किंमत ३०/-रुपये प्रत्येकी) (४) शोध घेते ते शिक्षण : लेखक - प्रा. रमेश पानसे (किंमत -५०/-रुपये) (५) मेंदूसंशोधन विशेषांक ( किंमत ४०/-रुपये)

# ग्रंथालयातील नवी पुस्तके

**DHARAVI : DOCUMENTING INFORMALITIES, THE ROYAL UNIVERSITY COLLEGE OF FINE ARTS : DEPARTMENT OF ART & ARCHITECTURE,** Editors - Maria Lantz and Jonatan Habib Engqvist, Academic Foundation, New Delhi - 110 002, Indian Edition 2009, Total pages - 303, Price - Rs. 1200/-.

'धारावी' हे नाव न ऐकलेला माणूस सापडणे कठीणच. मायानगरी मुंबापुरीच्या पोटात सामावलेले हे आणखी एक छोटेसे, स्वायत्त महानगरच जणू. धारावीच्या बाबतीत प्रत्येकाच्या भावभावना वेगवेगळ्या असल्याचे दिसते. पांढरपेशा स्तरांतील मुंबईकरांच्या चष्म्यातून पाहिले तर धारावी म्हणजे अनधिकृत वस्ती ठरते. नव्यानेच मुंबईत येणा-यांच्या दृष्टिकोनातून बघितले तर धारावी त्याची आश्रयदाती असते. तर, बांधकाम व्यावसायिकांच्या लेखी 'धारावी' नावाचे मानवी अस्तित्व ज्या विशाल भूखंडावर अंकुरलेले आहे ती जमीन अब्जावधींची हमी असते ! प्रत्यक्षात, धारावी म्हणजे या सगळ्यासकट याहूनही अधिक असे काही तरी आहे. हे ते 'अधिक' असणारे नेमके काय असावे याचा शोध घेण्याचा प्रयत्न या देखण्या ग्रंथात केलेला दिसतो. हे पुस्तक शब्दशः 'देखणे' आहे कारण प्रत्यक्षात हे पुस्तक म्हणजे आहे एक 'फोटो एस्से'. 'धारावी' असे नाव असणा-या एका भू-मानवी एककाचे छायाचित्रणात्मक दस्तऐवजीकरण आणि त्याला संशोधकीय विवेचनाची प्रगल्भ जोड, असे या ग्रंथाचे स्वरूप आहे. विशेष म्हणजे, हे दस्तऐवजीकरण निखळ आंतरविद्याशाखीय आहे. पत्रकार, तत्त्वज्ञानाचे अभ्यासक, ललितकला तसेच सौंदर्यशास्त्राचे व्यासंगी, वास्तुशास्त्रज्ञ, नगररचनाकार, चित्रकार अशा नानाविध क्षेत्रांतील जिज्ञासूंनी धारावी समजावून घेण्यासाठी केलेल्या एकात्म प्रयत्नांमधून हा अभ्यास साकारलेला आहे. मुख्य म्हणजे, हे सगळे जिज्ञासू परदेशी आहेत. स्वीडनमधील स्टॉकहोम विद्यापीठाशी या ना त्या प्रकारे संलग्न असलेल्या या चमूने हे 'धारावी-दर्शन' घडविलेले आहे. ■■



RNI Regn.No. MAHMAR/2002/9806
Postal Regn.No.: PNCW/M-125/2010-2012
Licensed to Post Without Prepayment, LICENCE NO. LWP-228
Posted at Market Yard P.S.O., Pune, on 10th of each month

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग -व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/ पुस्तिका प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक ('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते.

■संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात.

■अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणा-या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

## - संस्थेचे नियंत्रण मंडळ -

●विकास चित्रे ●सुरिंदर जोधका ●अभय टिळक ●कुमुदिनी दांडेकर
●ललित देशपांडे ●द.ना. धनागरे ●आनंद नाडकर्णी
●सुहास पळशीकर ●रमेश पानसे ●मनोहर भिडे ●योगेंद्र यादव ●नीळकंठ रथ
●ए.वैद्यनाथन ●एस. श्रीरामन ●जया सागडे ●रामदास होनावर

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक रामदास होनावर यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**